। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ८९ वा । गुरूवार दिनांक ११ जून, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## भूम येथे अपघातात ७ जण जखमी:दोघांची प्रकृती गंभीर



भूम (प्रतिनिधी)- अहिल्या नगर मार्गावरील चिंचोली (स्व. गोपीनाथ मुंडे चौक) गोलाई चौकात तीन वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात सात जण जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी धाराशिव येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चिंचोली गोलाई चौकात ईट, नगर आणि भूम या तीन दिशांमधून वाहने एकाच वेळी चौकात आल्याने रामकुंड येथील क्रूझर, बुरुडवाडी येथील पिकअप आणि भूम येथील चारचाकी वाहनांची जोरदार धडक झाली. या तिहेरी धडकेत अपघाताची तीव्रता वाढली. या अपघातात सचिन सुभाष येवते (भूम), प्रवीण शिवाजी हाके (रा. रामकुंड), राजाराम भगवान हाके (रा. रामकुंड), राणी हौसेराव शिंदे (रा. बुरुडवाडी), स्नेहा हौसेराव शिंदे (रा. बुरुडवाडी), अर्चना एकनाथ शिंदे (रा. बुरुडवाडी) आणि कोकिळा विश्वास दुरुगुंडे हे जखमी झाले आहेत. गंभीर जखमी झालेल्या प्रवीण शिवाजी हाके आणि राणी हौसेराव शिंदे यांना भूम येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी धाराशिव येथे रेफर करण्यात आले आहे. उर्वरित जखमींवर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य करत जखमींना रुग्णालयात हलविले. या अपघाताची नोंद संबंधित यंत्रणेकडून करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, या चौकात तीनही बाजूंनी वाहनांची मोठी वर्दळ असल्याने वारंवार अपघात होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. चौकात स्ट्रिप गतिरोधक बसवून वाहतूक नियंत्रणाची ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## वाडी बामणी येथे पर्यावरण दिनानिमित्त महिला शेतकऱ्यांसाठी कृषी व जनजागृती कार्यक्रम



तेर (प्रतिनिधी)- जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून धाराशिव तालुक्यातील वाडी बामणी येथे स्वयं शिक्षण प्रयोग अंतर्गत कार्यरत मंजिरी सखी फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या वतीने महिला शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला.

बदलत्या हवामानामुळे शेतीसमोर निर्माण होणाऱ्या आव्हानांची जाणीव करून देणे, शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करणे आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश महिलांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. ५ जून रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली डीपीडीसी हॉल, धाराशिव येथे अल निनो या हवामान बदलाच्या संकटावर कार्यशाळा झाली होती. त्या माहितीचा प्रसार या कार्यक्रमातून करण्यात आला.

कार्यक्रमात अल निनोमुळे पावसातील अनिश्चितता, उत्पादनावर होणारा परिणाम तसेच उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सेंद्रिय शेती, बीज प्रक्रिया, उगवण क्षमता तपासणी, दशपर्णी अर्क, जीवामृत, तसेच सौर ट्रॅप्सच्या वापराबाबत प्रात्यक्षिके घेण्यात आली. महिलांनी प्रत्यक्ष सहभाग घेत माहिती समजून घेतली. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी आंबा, नारळ व इतर वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमात मंजिरी सखीच्या संचालिका दिपाली थोडसरे, सुमित्रा शिराळ, तसेच अमेय भोसले यांनी मार्गदर्शन केले.

सेंद्रिय शेती व हवामान बदलावर भर दिला आहे कार्यक्रमात बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सेंद्रिय शेतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. दशपर्णी अर्क, जीवामृत व गांडूळ खत निर्मितीचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखवण्यात आले. रासायनिक खतांऐवजी नैसर्गिक उपायांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

## रेशन धान्य वाटपासाठी जूनअखेरपर्यंत मुदत द्या रास्तभाव धान्य दुकानदार संघटनांची मागणी



धाराशिव, (प्रतिनिधी)- चालू महिन्याच्या रेशन धान्य वाटपासाठी जून अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानदार संघटनांच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

एप्रिल, मे व जून २०२६ या महिन्यांच्या धान्य वितरणासाठी यापूर्वी ३१ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, जून महिन्यात अनेक तालुक्यांतील रास्तभाव दुकानदारांकडे धान्य वेळेत पोहोचलेले नाही. तांदळाची आवक गोंदियामधून होत असल्याने पुरवठ्यात विलंब झाला आहे. अनेक दुकानांमध्ये अद्याप धान्य उपलब्ध झालेले नाही. अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने ४ जून रोजी मे व जून महिन्यांच्या धान्य वितरणासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ दिली असली, तरी जिल्ह्यातील परिस्थिती लक्षात घेता आणखी मुदतवाढ आवश्यक असल्याचे संघटनांनी नमूद केले आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ८० रास्तभाव धान्य दुकाने आहेत. त्यापैकी ९ जूनपर्यंत केवळ ८३० दुकानांमध्ये प्रत्यक्ष धान्य उपलब्ध झाले आहे. तर सुमारे २५० दुकानांमध्ये धान्य पोहोचले नसल्याचा दावा जिल्हा रास्तभाव दुकानदार संघटनांनी केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व रास्तभाव दुकानदारांना जून २०२६ च्या धान्य वितरणासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ढोकी ग्रामीण, उमरगा ग्रामीण, कळंब ग्रामीण आणि येरमाळा ग्रामीण येथील शासकीय गोदामांमध्ये तांदळाचा साठा उपलब्ध नसल्याकडेही निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे.
यावेळी मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष काकासाहेब कासार, विभागीय सचिव प्रसाद उज्वलसिंह राजेनिंबाळकर, जिल्हा सहसचिव राजकुमार पवार, जिल्हा कोषाध्यक्ष प्रफुल्लकुमार शेटे, आदर्श साळुंके, डी. डी. जगदाळे, ए. व्ही. किरदत्त, ए. एस. बोंदर आदी उपस्थित होते.

## क्राईम न्युज

### ईलेक्ट्रीक तांब्याच्या वायरची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शाम निवृत्ती ढेरे, वय ४८ वर्षे, रा. काक्रंबा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे व इतर शेतकरी यांचे शेतातील विहरी व सोलार वरील ईलेक्ट्रीक तांब्याचे वायर ३९७ मिटर २७,७९० किंमतीचा माल दि.३०.०५.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शाम ढेरे यांनी दि.०९.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल.

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मंहमद वय ३५ वर्षे, रा. नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि. ०८.०६.२०२६ रोजी भोसगी शिवारात आष्टामोड येथे एनएच ६५ चे सर्विस रोडवर बिराज बेकरी समोर टॅम्पो क्र एमएच २५ ए.जे.५२७५ मध्ये ११ म्हशी एकुण ८०,००० वाहनसह ५,८०,००० किंमतीचे जनावरांची चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना मुरुम पोलीस ठाण्याचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (ए) (डी) (एच) सह कलम ५(अ),५(ब),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रन्सफॉर्मर बनवण्याचे कॉपर वायर स्क्रॅप व ॲल्युमिनीयम वायर बॉबीनची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रकाश नागाप्पा मुलगे, वय ३८वर्षे, रा. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांचे त्रिकोळी रोड उमरगा येथील ट्रन्सफॉर्मर बनवण्याचे कॉपर वायर स्क्रॅप व ॲल्युमिनीयम वायर बॉबीन मोकळ्या जागेत एकुण १,९१,८०० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. दि.०८.०६.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रकाश मुलगे यांनी दि.०९.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पोलिसांची 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव, (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०९जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ४६० कारवाया करुन ४,७०,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## दलालांपासून सावध राहा; शासकीय सेवांसाठी थेट अधिकृत मार्गाचा वापर करा - तहसीलदार डॉ. मृणाल जाधव




धाराशिव (शेख अंजुम)- धाराशिव शहर व तालुक्यात शिधापत्रिका तसेच विविध शासकीय सेवांसाठी एजंट आणि दलालांचा सुळसुळाट वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी डॉ. मृणाल जाधव यांनी नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. शासकीय कामांसाठी कोणत्याही अनधिकृत व्यक्ती किंवा दलालांकडे महत्त्वाची कागदपत्रे देऊ नयेत, असे आवाहन त्यांनी केले आहे.

तहसील प्रशासनाकडे काही ठिकाणी नागरिकांची कागदपत्रे गोळा करून अवाजवी पैसे उकळण्याचे प्रकार होत असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता वाढली असून प्रशासनाने याबाबत सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

तहसीलदार डॉ. जाधव यांनी सांगितले की, शिधापत्रिका, उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला तसेच इतर शासकीय सेवांसाठी नागरिकांनी स्वतः ऑनलाइन अर्ज करावा किंवा अधिकृत सेवा केंद्रांची मदत घ्यावी. कोणत्याही एजंट अथवा दलालामार्फत अर्ज प्रक्रिया केल्यास अनावश्यक आर्थिक नुकसान होऊ शकते.

शासकीय सेवा आता अधिक पारदर्शक आणि ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध असल्याने नागरिकांनी अधिकृत मार्गानेच कामे करावीत. संशयास्पद व्यक्तींकडे कागदपत्रे सुपूर्द करू नयेत तसेच फसवणुकीच्या प्रकारांची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन तहसील प्रशासनाने केले आहे.

दलालांच्या जाळ्यात अडकू नका; शासकीय सेवांसाठी थेट अधिकृत मार्गाचा वापर करा आणि आर्थिक फसवणूक टाळा, असा संदेश प्रशासनाने नागरिकांना दिला आहे.

## गरोदर मातांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या सर्व तपासण्या अन् सल्लाही: सास्तूरमध्ये प्रधानमंत्री मातृत्व अभियान शिबिरात १०५ गरोदर मातांची तपासणी



लोहारा(प्रतिनिधी)-गरोदर मातेच्या सुदृढ आरोग्यासाठी हिमोग्लोबिन तपासणी, रक्तगट तपासणी, युरीन अल्ब्युमिन तपासणी, गरोदरपणातील मधुमेह तपासणी, हिपॅटायटिस-बी, सिफिलिस तपासणी तसेच मोफत सोनोग्राफी करण्यात आली. याशिवाय गंभीर रक्तक्षय, गरोदरपणातील उच्च रक्तदाब, गरोदरपणातील मधुमेह तसेच पूर्वी एलएससीएस झालेले गरोदर मातांची विशेष तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. तपासणीदरम्यान उच्च जोखमीच्या गरोदर मातांची स्वतंत्र नोंद घेऊन त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिल्या. लोहारा तालुक्यातील सास्तूर येथील स्पर्श रुग्णालयात प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत मंगळवारी विशेष शिबिर घेण्यात आले. या शिबिरात १०५ गरोदर मातांची मोफत तपासणी करण्यात आली.

देशातील माता मृत्युदर कमी करण्यासाठी आणि गरोदर मातांना सुरक्षित आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाने' गेल्या दहा वर्षांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातील गरोदर महिलांपर्यंत गुणवत्तापूर्ण, नियमित आणि मोफत आरोग्य सेवा पोहोचवण्यात या अभियानाने महत्त्वाची भूमिका बजावली असून, याच प्रयत्नांमुळे देश व राज्य पातळीवर माता मृत्युदरात मोठी घट झाल्याचे चित्र दिसून येत आहे. या अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त सास्तूर येथील स्पर्श रुग्णालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या आदेशानुसार तसेच रुग्णालयाचे प्रकल्प अधिकारी रमाकांत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

माता मृत्युदरात दिलासादायक घट प्रकल्प अधिकारी रमाकांत जोशी म्हणाले, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाने गेल्या १० वर्षांत माता मृत्युदर कमी करण्यात मोठे योगदान आले आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक गरोदर मातेपर्यंत तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा, आवश्यक तपासण्या आणि योग्य उपचार वेळेत पोहोचवणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दशकपूर्तीनिमित्त राज्यभर विशेष जनजागृती उपक्रम राबवला असून, मातृ सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. महाराष्ट्राने माता सुरक्षिततेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. राज्यातील माता मृत्युदर २०१४-१६ मध्ये ६१ इतका होता, तो आता ३७ पर्यंत खाली आणण्यात यश आले आहे. ही २४ अंकांची घट आरोग्य विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. गरोदर मातांना वेळेत उपचार मिळत असल्यामुळे अनेक मातांचे जीव वाचवण्यात यश आले आहे.

आरोग्य विषयक नऊचा संकल्प उपयुक्त दर महिन्याच्या ९ तारखेला आरोग्य विषयक नऊचा संकल्प मोहिमेअंतर्गत गरोदर मातांसाठी विशेष तपासणी शिबिर आयोजित करण्यात येते. याच उपक्रमांतर्गत यावेळी मोठ्या प्रमाणावर गरोदर मातांनी सहभाग नोंदवला.ग्रामीण भागातील महिलांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्श ग्रामीण रुग्णालय सातत्याने विविध आरोग्य उपक्रम राबवत असून, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाच्या माध्यमातून अनेक गरोदर मातांना मोठा दिलासा मिळत असल्याची भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

## नळदुर्ग येथे वैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेलीम माहिती अशी की, इस्माईल जबिउल्ला खुदरतुल्ला काझी, वय २२ वर्षे, रा. काझी गल्ली नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी काझी गल्ली नळदुर्ग येथील रहाते घरात महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ बाबा तंबाखु ४९०, रत्ना ब्रॅन्ड तंबाखु ६० डबे, बाबा तंबाखु ६० डबे,बाबा सेंनटेब तंबाखु ५०० ग्रॅम १४४ डबे असे एकुण ३,५८,६१० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला अन्न व सुरक्षा अधिकारी अन्न व औषध प्रशासन मा.राज्य धराशिव यांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-१२३, २२३, २७४, २७५ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम कलम ५९ अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## यशस्वी बारा वर्ष:आगामी काळ कठिण

जनतेच्या अपेक्षा ह्या काम करण्याकडून असतात, त्यामुळे बारावर्षात मोठे परिवर्तन व्हावे अशी अपेक्षा होती मात्र प्रत्यक्षात अवघड काम होते. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पंतप्राधानाची सुत्रे हाती घेतल्यापासून बारावर्षपुर्ण केली. अगामी काळ कठिण असणार आहे. वास्तविक देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्षे होतात. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहण्याचा विक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी मोडला. निवडून आलेले पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ पदावर राहण्याचा मान नरेंद्र मोदी यांना मिळतो. १० जून रोजी, निवडून आलेले पंतप्रधान म्हणून मोदींचा ४,३९९ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण होत आहे. पंतप्रधान म्हणून जवाहरलाल नेहरूंचा कार्यकाळ ४,३९८ दिवसांचा होता. सरकारचा कार्यकाळ आणि पंतप्रधानपदाचे एक तप पूर्ण झाले आहे. या बारा वर्षांच्या कालखंडात मोदी सरकारने भारताची नवी ओळख निर्माण केली आहे हे मान्यच केले पाहिजे. पंडित जवाहरलाल नेहरू १९५२ मध्ये पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा निवडून आले होते. त्यांचा १९४७ ते १९५२ हा कार्यकाळ हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून होता. त्यावेळी निवडणुकांची प्रक्रिया प्रस्थापित होऊन पार पडली नव्हती. यामुळे नेहरू यांचा हा काळ निवडून आलेले पंतप्रधान म्हणून गणला जात नाही. २०२४ मध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंडित नेहरूंच्या एका ऐतिहासिक विक्रमाची बरोबरी केली आहे. पंडित नेहरू १९५२, १९५७ आणि १९६२ अशा सलग तीन निवडणुका जिंकून पंतप्रधान झाले होते. तर मोदी २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये सलग तीन निवडणुका जिंकणारे पंतप्रधान ठरले आहेत. त्यांच्या काळात रस्तेविकास, रेल्वे आणि हवाई वाहतुकीत क्रांती झाली आहे. २६ शहरांमध्ये १,१०० कि.मी.हून अधिक मेट्रोचे जाळे पसरले आहे. १६४ 'वंदे भारत' एक्स्प्रेस धावत आहेत. अटल सेतू, सुदर्शन सेतू, चिनाब रेल्वे ब्रिज यांसारखे प्रकल्प भारताच्या ताकदीची साक्ष देत आहेत. विमानतळांची संख्या ७४ वरून थेट १६४ वर पोहोचली. 'पीएम किसान सन्मान निधी' अंतर्गत ४.३ लाख कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाले. हमीभावावर २६ लाख कोटींची विक्रमी पीक खरेदी झाली, तर ४ कोटी शेतकऱ्यांना २ लाख कोटींचा पीक विमा मिळाला. मध्यमवर्गीय नोकरदारांना मोठा दिलासा देत वर्षाला १२.७५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न 'टॅक्स फ्री' करण्यात आले आहे. तसे पाहिले तर पंतप्रधान मोदी केंद्रात मंत्री होते. गुजरातचे अनेक काळ मुख्यमंत्रीपदी विराजमान होते अशा स्थितीत राजकिय प्रचंड अनुभव पाहाता व कार्यकुशलता असल्याने ते यशस्वी पंतप्रधान गणले गेले. जगातील अनेक देशाचा संपर्क या बारा वर्षात आला आहे. बारा वर्षात बरेच काही झाले असले तरी जे कार्य जनतेच्या दृष्टिने अपेक्षित आहे ते होणे बाकी आहे. अनेक ग्रामीण भागात पिण्याचा प्रश्न सुटला नाही. वेगवान इंटरनेट सेवा आवश्यक आहे. इतर देशाच्या तुलनेने भारत हा मागासलेलाच आहे. काही देशाने अल्पावधीत मोठी प्रगती केली. वास्तविक जगात सर्व निर्माण करता येते. राष्ट्रप्रेम निर्माण करावे लागते. येथेच भारतीय कमी पडले आहेत. आज जाती व धर्मात आडकलेल यातून बाहेर आवघड आहे. देशाचे काहिंही झाले तरी चालेले आपले अस्तित्व टिकले पाहिजेत. अशा विचाराने चालत आलेली संस्कृती अधोगतीस कारणीभुत ठरत आहे. मुळात मुळ पाया चुकीचा रचला गेला. भारतला स्वराज्य मिळाले. हे काही सहज मिळाले नाही. दिडशे वर्ष संघर्ष करावा. रक्ताच्या नद्या वाहिल्या. अनेकांचे कुंकू पुसले. अनेक माता पोरक्या झाल्या असा संघर्षमय वातावरणात देशाला स्वराज्य मिळाले. अहिंसेच्या मार्गाने स्वराज्य मिळाले नाही ही बाब पहिल्यांदा लक्षात घेतली पाहिजे. आपला इतिहास हा गौरवशाली आहे. तो लपविला गेला. ठराविकांच्या लाडापायी देशाचे वाटोळे झाले. काँग्रेसच्या पहिल्या बैठकीत पंतप्रधानपदीसाठी लोहपुरूष सरदार पटेल निवडले गेले असताना म. गांधी यांच्या अग्रहास्तव पंडित जवाहर नेहरू यांच्या हाती पंतप्रधानपद दिले. यातच मोठी चुक झाली, जे काम लोहपुरूष सरदारपटेल करू शकले असेत ते नेहरू यांच्याकडून होणार नाही ही बाब प्रत्यक्षात खरी ठरली. सर्वात मोठी चुक कोणती असेल तर पाकिस्तान निर्मितीची! पाकिस्तान निर्मितीस विरोध अपेक्षित होता. तो होवू नये यासाठी प्रयत्न झाले असते तर आज ज्या समस्याला तोंड द्यावे लागते त्याची गरज भासली नसती. आपणच निर्माण केलेला हा भारताचा शत्रु बनला आहे. तेथील नागरिकांची मानसिकता द्वेशाची बनली. चीन सोबत आंतराने राहाणे अपेक्षित असताना भाई-भाईचा नारा दिला. ती एक डोकेदुखी निर्माण झाली. त्याच प्रमाणे आज देशात भ्रष्टाचार संपला नाही. वाढ झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात देशात शांतता आहे. स्फोट किंवा दंगली घडल्या नाहीत. युपीएच्या काळात भ्रष्टाचाराबरोबर अशांतात होती. भारताला कोणीही भीत नव्हते. पंतप्रधान मोदीजी आल्यानंतर भ्रष्टाचार संपला नाही मात्र त्याला ब्रेक लागले. काही बाबी चांगल्या झाल्या आहेत. जनतेच्या मनात अपेक्षा मोठया व अनेक आहेत. काही अशक्यही आहेत. त्यामुळे सध्याला काँग्रेसपेक्षा भाजपाप्रणीत सरकार बरे म्हणून चालत आहेत. अतिउत्तम सरकार आहे असे नाही दगडापेक्षा वीट मऊ म्हणून चालावे लागत आहे ही वस्तूस्थिती आहे. भारताची उभारणी ही कृषीप्रधान देश म्हणून झालेली आहे. भारतीयांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. या मुळ व्यावसायाकडे जाणून-बजून राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. नियोजनबद्धपने कार्य केले तर भारतपुन्हा 'सोनेकी चिडीया' पुन्हा निर्माण होवू शकते. जगातील नागरिकापेक्षा भारतीय नागरिकांची बुद्धी अधिक आहे. म्हणून जगात भारतीय नागरिक यशस्वी झाले आहेत. अमेरिकेत बहुतांशी बुद्धीमान भारतीय आहेत. या बाबीचा विचार आता आगामी काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला पाहिजे. पंतप्रधान मोदी यांच्याकडून सर्व चांगले व्हावे अशी अपेक्षा नाही. अभाळ फाटल्यावर ढिगल लावणे अशक्य आहे तसे सर्व चांगले रामराज्याची कल्पना अस्तित्वात उतरणे अशक्य आहे. तरी बारा वर्षात चांगले काम केले म्हणून अनेक राज्य भाजपाला जिंकता आले ही एक यशाची पावती आहे. पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# 'मेडिसिटी'द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

***राज्य शासन, क्लीव्हलँड क्लिनिक, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यात नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी (एनएमआयएमसी) विकसित करण्यासाठी सामंजस्य करार**
***एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था विकसित करण्यासाठी १.२ अब्ज अमेरिकी डॉलरच्या गुंतवणुकीची बांधिलकी**

**मुंबई/प्रतिनिधी:** क्लीव्हलँड, ओहायो । १० : 'मेडिसिटी' ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'हील इन इंडिया' या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषतः डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले.

भारताचे पहिले जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे २५० एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे.

प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे १.२ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि १०,००० हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत.

मेडिसिटीभोवती विकसित होणाऱ्या व्यापक नवोन्मेष परिसंस्थेचा भाग म्हणून, लक्ष्मी एन. मित्तल यांनी स्थापन केलेल्या एलएनएमआयआयटी, जयपूरने क्लीव्हलँड क्लिनिक आणि एनएमआयएमसीसोबत संशोधन पायाभूत सुविधा, प्रगत तंत्रज्ञान क्षमता आणि शैक्षणिक कौशल्य उपलब्ध करून अत्याधुनिक आरोग्य सेवा नवोन्मेष, ट्रान्सलेशनल रिसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रिसिजन मेडिसिन उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

क्लीव्हलँड क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ. टॉम मिहाल्जेविक म्हणाले, क्लीव्हलँड क्लिनिक जगभरातील धोरणात्मक भागीदारीद्वारे रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी कटिबद्ध आहे. एनएमआयएमसी हा भविष्यातील रुग्ण, आरोग्य व्यावसायिक आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दूरदर्शी आरोग्य परिसंस्थेत आमचे कौशल्य योगदान देण्याची संधी आहे. महाराष्ट्र शासन, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भारतात क्लिनिकल उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शिक्षणासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उभारण्यासाठी सहकार्य करताना आम्हाला आनंद होत आहे.

ब्रुकफिल्डचे व्यवस्थापकीय भागीदार आणि आशिया पॅसिफिक विभागाचे रिअल इस्टेट प्रमुख अंकुर गुप्ता म्हणाले, नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडवून आणणारी पायाभूत सुविधा उभारण्याची एक अद्वितीय संधी आहे. महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भविष्यातील अनेक पिढ्यांना लाभदायी ठरणारे जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा केंद्र उभारण्याचा आम्हाला अभिमान आहे.

आरोधन हेल्थ सिटीच्या संस्थापक आणि संचालक डॉ. सलोनी पटवर्धन म्हणाल्या, जगातील सर्वोत्तम संस्थांना एकत्र आणून एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था निर्माण करणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आजचा हा टप्पा आम्हाला त्या ध्येयाच्या आणखी जवळ घेऊन गेला असून नवी मुंबईमध्ये जागतिक आरोग्य सेवा केंद्र स्थापन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे.

महाराष्ट्र शासन या भागीदारीसाठी आवश्यक सहकार्य करेल तसेच लागू असलेल्या धोरणे आणि नियमांनुसार आवश्यक मंजुरी आणि परवानग्या मिळविण्यासाठी या समूहाला मदत करेल.

***नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विषयी***

नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी हा महाराष्ट्र शासन विकसित करत असलेला एक परिवर्तनकारी आरोग्य आणि जीवन विज्ञान उपक्रम आहे. भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक म्हणून विकसित होणारा हा प्रकल्प नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत उभारला जाणार आहे. जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा प्रदाते, संशोधक, शिक्षक, नवोन्मेषक आणि गुंतवणूकदार यांना एकत्र आणून क्लिनिकल उत्कृष्टता, संशोधन, नवोन्मेष आणि वैद्यकीय शिक्षणावर आधारित जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक आरोग्य सेवा केंद्र निर्माण करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

# पालखी मार्गांचे हरितीकरण एक लोकचळवळ बनवू या - मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई/प्रतिनिधी:** आषाढी वारीच्या परंपरेला पर्यावरण संवर्धनाची जोड देऊन राज्यातील पालखी मार्गांचे व्यापक हरितीकरण करण्यास शासन कटीबद्ध आहे. हा उपक्रम शासन, अध्यात्मिक संस्था आणि लोकसहभागाच्या माध्यमातून एक लोकचळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी निर्मल वारी आणि हरित वारी उपक्रमाच्या आढावा बैठकीत दिले. बैठकीत पालखी मार्गांवरील वृक्षारोपण आणि हरितीकरणाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पालखी मार्गावर वृक्ष संवर्धनासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, यासाठी पंढरपूर संस्थानचे विश्वस्त तथा संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजीराव मोरे यांनी केलेल्या विनंतीची प्राधान्याने दखल घेत या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या उपक्रमाचे मार्गदर्शक शिवाजी महाराज मोरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अभिजीत औटे, वन विभागाचे विवेक खांडेकर तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सेवा सहयोग फाउंडेशनचे अतुल नागरस व नरेंद्र वैशंपायन हेदेखील उपस्थित होते.

राज्यातील संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गांवर वारकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हरित पट्टे विकसित करण्यात येत आहेत. क्रिकेटच्या सामन्यादरम्यान जेवढे डॉट बॉल पडतील, तेवढे वृक्ष लावण्याचा लोकहितकारी उपक्रम मुंबई क्रिकेट असोसिएशनने हाती घेतला आहे. या उपक्रमातूनही या पालखी मार्गाचे हरितीकरण शक्य असल्याची सूचना मोरे यांनी यावेळी केली. त्यानुसार मंत्री ड. शेलार यांनी तात्काळ मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून वृक्ष लागवडीसाठी पालखी मार्गांचा विचार प्राधान्याने करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाचा सामना आणि ग्रामीण रोजगार निर्मितीच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल ३०० कोटी वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी अभियान हाती घेतले आहे. या मोहिमेच्या माध्यमातूनही पालखी मार्गाचे हरितीकरण शक्य असल्याची सूचना मोरे यांनी केली. त्यांच्या याही सूचनेची दखल घेत मंत्री ड. शेलार यांनी वरिष्ठ सनदी अधिकारी मिलिंद म्हैसकर यांच्याशी संपर्क साधून वृक्ष लागवडीसाठी पालखी मार्गांचा विचार प्राधान्याने करण्याची सूचना केली.

यावेळी मंत्री ड. शेलार म्हणाले, राज्यात पायाभूत सुविधा उभारताना वृक्ष कापावे. लागल्यास, संबंधित विकासकास अन्यत्र वृक्षलागवड करणे अनिवार्य असते. अशा प्रकारच्या वृक्ष लागवडीच्या माध्यमातूनही पालखी मार्गांचे हरितीकरण प्राधान्याने पूर्ण केले जावे. शासन, आध्यात्मिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि वारकरी यांचा सक्रिय सहभाग घेऊन हा प्रकल्प जनहिताची लोकचळवळ म्हणून यशस्वी करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने या कल्याणकारी उपक्रमासाठी ना हरकत प्रमाणपत्र देऊन योग्य ते सहकार्य करावे अशा सूचना मंत्री शेलार यांनी यावेळी केल्या. पालखी मार्गांवर सावली देणाऱ्या देशी वृक्षांच्या संवर्धनाबरोबरच त्यांची नियमित देखभाल, पाणीपुरवठा आणि संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश यावेळी मंत्री शेलार यांनी दिले. या उपक्रमामुळे वारकऱ्यांना पायी वारी करताना अधिक दिलासा मिळणार असून पर्यावरण संवर्धनालाही मोठी चालना मिळणार आहे. वारकरी परंपरा, पर्यावरण संरक्षण आणि लोकसहभाग यांचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरेल, असा विश्वास मंत्री ड. शेलार यांनी यावेळी व्यक्त केला.

## नवतंत्रज्ञानाचा जबाबदारीने स्वीकार करताना पत्रकारांनी सत्य पडताळणी आणि संपादकीय जबाबदारी अबाधित राखावी - राज्यपाल जिष्णु देव वर्मा




**मुंबई/प्रतिनिधी:** पत्रकारांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सातत्याने समाजासमोर मांडाव्यात. समाजातील दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील महत्त्वाचे साधन असले तरी भविष्य केवळ एआयवर अवलंबून नसून त्याच्या वापराला दिशा देणारी मानवी बुद्धिमत्ता, विवेक, सद्सद्विवेकबुद्धी आणि मूल्ये यावरच ते अवलंबून आहे. पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा जबाबदारीने स्वीकार करताना सत्य पडताळणी आणि संपादकीय जबाबदारी अबाधित राखावी, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित पत्रकारांच्या महाअधिवेशनात ते बोलत होते. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, प्रेरणादायी वक्ते गौर गोपाल दास, सकाळ मीडिया समूहाचे समूह संपादक निलेश खरे, वरिष्ठ पत्रकार सरिता कौशिक, मृणालिनी नानिवडेकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, मराठी पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष किरण जोशी, पत्रकार संघाचे पदाधिकारी, राज्यातून आलेले पत्रकार आदी यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, महाराष्ट्राने देशाला वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक नेतृत्व दिले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव अशा संतांनी समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश दिला आहे तसेच लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आचार्य अत्रे यांनी पत्रकारिता आणि लेखणीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे अविस्मरणीय कार्य केले. महाराष्ट्रातील पत्रकारांना या समृद्ध परंपरेचा वारसा लाभला असल्याचे देखील त्यांनी यावेळी नमूद केले.

उदारीकरणानंतर माध्यम क्षेत्रात मोठे बदल झाले असून उपग्रह वाहिन्या, इंटरनेट, डिजिटल आवृत्त्या, सामाजिक माध्यमे, ऑनलाइन पोर्टल्स आणि पॉडकास्ट यांच्या माध्यमातून माहितीच्या प्रसारणाची आणि ग्रहण करण्याची पद्धत पूर्णपणे बदलल्याचे राज्यपालांनी सांगितले. या बदलांमुळे माध्यम संस्थांना सतत नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेची पत्रकारांना मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. तथापि, एआयमुळे दिशाभूल करणारी माहिती, डीपफेक तंत्रज्ञान आणि बनावट दृश्य सामग्रीच्या माध्यमातून समाजात संभ्रम निर्माण होण्याचा धोका वाढत असल्याबद्दल राज्यपालांनी चिंता व्यक्त केली. नागरिकांचा माध्यमांवरील विश्वास टिकवून ठेवण्यासाठी सत्य पडताळणी आणि पत्रकारांची संपादकीय जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राज्यपाल म्हणाले की, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती या नात्याने त्यांनी विद्यापीठांना माध्यम अभ्यासक्रमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश करण्याचे निर्देश दिले आहेत. एआय साक्षरता, डिजिटल नैतिकता, डेटा पत्रकारिता आणि माध्यम पडताळणी यांसारख्या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी पत्रकार संघाने कृत्रिम बुद्धिमत्ता या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर पत्रकारांचे महाअधिवेशन आयोजित केल्याबद्दल राज्यपालांनी संघाचे अभिनंदन करीत सर्व पत्रकार बंधू-भगिनींना शुभेच्छा दिल्या.




# 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६' साठी नामांकनांना सुरुवात

**मुंबई/प्रतिनिधी:** प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ साठी ऑनलाईन नामांकन प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज https://awards.gov.in या संकेतस्थळावर सादर करण्याचे आवाहन महिला आणि बाल विकास मंत्रालयाने केले आहे.


भारतात वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक आणि ३१ जुलै २०२६ रोजी ५ ते १८ वर्षे वयोगटातील बालके या पुरस्कारासाठी पात्र आहेत. या पुरस्कारासाठी स्व-नामांकन तसेच तृतीय पक्षाकडून शिफारस अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांना मान्यता दिली जाणार आहे.

अर्ज करताना उमेदवारांनी वैयक्तिक माहिती, पुरस्काराचा प्रवर्ग, अलीकडील छायाचित्र आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या उल्लेखनीय कामगिरीची आणि तिच्या समाजावरील प्रभावाची माहिती १,००० शब्दांपर्यंत सादर करावी लागणार आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांतर्गत शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण तसेच कला व संस्कृती या सहा क्षेत्रांमध्ये असाधारण कामगिरी करणाऱ्या बालकांचा गौरव करण्यात येतो. शौर्य प्रवर्गात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांचे प्राण वाचविण्यासाठी धैर्य दाखवणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो. क्रीडा प्रवर्गात राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या मुलांना गौरविण्यात येते. समाजसेवा प्रवर्गात समाजकल्याण, पर्यावरण संवर्धन, गरजूंना मदत आणि राष्ट्रीय कार्यांमध्ये सक्रिय योगदान देणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो. विज्ञान व तंत्रज्ञान प्रवर्गात संशोधन, नवोपक्रम किंवा वैज्ञानिक नमुने विकसित करणाऱ्या मुलांना पुरस्कार दिला जातो. पर्यावरण प्रवर्गात शाश्वत विकास, जनजागृती मोहीम किंवा पर्यावरणपूरक नवकल्पनांमध्ये विशेष योगदान देणाऱ्या मुलांची निवड केली जाते. तर कला व संस्कृती प्रवर्गात संगीत, नृत्य, लेखन, चित्रकला, अभिनय किंवा इतर कलाक्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रावीण्य मिळवलेल्या मुलांचा गौरव केला जातो.

महिला आणि बाल विकास मंत्रालयाने शाळा, शैक्षणिक संस्था, पालक, मार्गदर्शक आणि सर्वसामान्य नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी देशातील प्रतिभावान आणि प्रेरणादायी बालकांचा शोध घेऊन त्यांच्या नावांची शिफारस करावी. देशातील प्रत्येक गुणी आणि कर्तृत्ववान बालकाला राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळावी, यासाठी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

# सुखी जीवनाची चार सुत्रे



जगातल्या कुठल्याही प्रश्नावर समाधान नाही असे होऊच शकत नाही. त्यात मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे निष्ठा व प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सर्व शक्य आहे. जीवनाला उपयुक्त बनवण्याचे अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्याचा जीवनात समावेश केल्यामुळे बहुतांशी अडचणी सुटू शकतात. या चार गोष्टींना जीवनाचे सार म्हटले जाऊ शकते. सर्व विकारांचा त्याग, कपट सोडून साधेपण स्वीकारणे, बंधनातून मुक्त होण्याचे साहस व जीवनात अध्यात्मवादाचा समावेश केला तर मानवाचे व्यर्थ जीवन उपयुक्त बनेल. त्याच्या जीवनात आनंद व उल्हास, शांती व समाधानात वाढ होईल.विकार मानव जीवनातील सर्वात मोठा अडथळा आहे. हा दोष मानवाला फक्त विकृती देतो. मानवास उदारता, दान, दया, प्रेम किंवा करुणा प्रवृत्तींपासून वंचित करतो म्हणून त्याच्या भौतिक इच्छा एवढ्या वाढतात की, संग्रह करण्यात त्यास योग्य-अयोग्य, कर्तव्य-अकर्तव्य, आपले-त्रयस्थ, शोषण-पोषण कशाचेच भान राहत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, सर्व मर्यादा व धोरणं व्यर्थ वाटू लागतात. अशा विकारी मानवाच्या जीवनात शोक-संताप व अशांती, असंतोषाशिवाय दुसरे काय मिळू शकते? विकृती मानवाचा फार मोठा दोष आहे, याचा त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मानवासाठी दोन अलंकार मानले गेले आहेत. ते अंगीकारण्यातच त्याचे भले आहे. उदारतेचा गुण आपल्या इतर गुण त्यागांना प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्यापेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह, धोरण व आदर्शाविरुद्ध नाही. उदारता परमार्थासाठी अर्जित केली जाते. उदार पुरुष निती नियमाने मिळवलेल्या पैशाने सुखी व समाधानी असतो. अशा लोकांचे प्रश्न आपोआप सुटतात.

## उपदेशकथा: विकल्प


एक पवित्र व वयस्कर सन्यासी आणि त्यांचा शिष्य दोघे प्रवासाला निघाले. वाटेमध्ये



एक मोठा ओढा लागला. ओढ्याच्या काठी ते दोघेजण विश्रांती घेत होते. इतक्यात एक तरुण गवळण तेथे आली. तिला ओढा ओलांडून जाण्याचा काही धीर होईना. तिने स्वामींना मदत करण्याची विनंती केली. स्वामींनी तिला खांद्यावर बसवली आणि तिघेजण सावकाशपणे ओढा पार करून गेले. स्वामींच्या पाया पडून ती गवळण निघून गेली. नंतर गुरू व शिष्य पुढील प्रवासाला निघाले. दोघेजण चालत होते खरे पण शिष्याच्या मनातील विकल्प त्याला चैन पडू देईना. अखेर पाच दहा मैल चालून गेल्यावर तो म्हणाला, 'स्वामी! आपण संन्यासी आहात. आपल्याला स्त्रीचा स्पर्श वर्ज्य आहे. असे असताना आपण त्या गवळणीला खांद्यावर कसे घेतले? त्यावर स्वामी हसून एवढेच बोलले, 'अरे! ती गवळण अजून तुझ्या खांद्यावर आहे. याला काय करावे?'

**कथा उपदेश : आपले मन शुद्ध हवे.**

# हृदयविकार, मधुमेह आणि लठ्ठपणाची चिंता?



मुंबई : वाढते शहरीकरण, आजचे धकाधकीचे जीवन, खाण्याच्या सवयी, शारीरिक व्यायामाचा अभाव आणि कमी पौष्टिक आहार या गोष्टी सध्या तरुणांमध्ये दिसत आहेत. आजकालच्या बदलत्या जीवनशैलीमुळे याचा परिणाम वृद्ध लोकांसह युवकांमध्ये होत आहे व त्यांच्यामध्ये कोलेस्ट्रॉलचे (क्ळसह उहेश्र्रशीींशीश्र) प्रमाण वाढत आहे. कोलेस्टेरॉल हे हृदयविकार, मधुमेह आणि लठ्ठपणाचे कारण असून त्यावर नियंत्रण ठेवणं कठीण आहे. कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी व्यायामासोबत योग्य आहारा घेणे फार गरजेचे आहे. तुमच्या स्वयंपाकघरातील हा पदार्थ तुम्हाला कोलेस्ट्रॉलवर मात करण्यासाठी मदत करु शकतो.प्रत्येक घरात स्वयंपाकात नारळाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. घरांमध्ये 'नारळाची चटणी' ही आवर्जून बनवली जाते. न्यूट्रिशनिस्ट आणि डाएटिशियननुसार ही पांढरी नारळाची चटणी आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. नारळाची ही चटणी सेवन केल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. त्याशिवाय रक्तदाब नियंत्रित करणे, कोलेस्ट्रॉल कमी करणे आणि पचन सुधारण्यासाही मदत मिळते. मात्र या चटणीत सॅच्युरेटेड फॅट असल्याने ती योग्य प्रमाणात सेवन करावी लागते. अन्यथा तिचे शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतात.न्यूट्रिशनिस्ट आणि डाएटिशियननुसार नारळात जास्त प्रमाणात फायबर असते. त्यामुळे ही नारळाची चटणी दररोज २-३ चमचे खाल्ल्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारते. त्याशिवाय या चटणीचं सेवन केल्यामुळे पोटदुखी, जुलाब आणि बद्धकोष्ठता सारख्या समस्यांपासून मुक्तता मिळते. नारळाच्या चटणीत अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असल्याने ती आपल्या शरीरासाठी अतिशय फायदेशीर असते. यामुळे उच्च रक्तदाबाची समस्या दूर होते व शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी सुधारण्यास मदत मिळते. इतकेच नव्हे तर हृदयाशी संबंधित आजाराचा धोकादेखील टळतो. अगदी तुम्हाला वजन कमी करायचं असेल तरीही नारळाची चटणी उपयुक्त ठरते. कारण या चटणीचे सेवन केल्यामुळे मेटाबॉलिज्म रेट वाढतं आणि त्यामुळे तुमचं वजन कमी होण्यास मदत मिळते. अशा प्रकारे वैज्ञानिकांनुसार फायबर भरपूर असलेल्या नारळाच्या चटणीने हाय कोलेस्ट्रॉलने हैराण असणाऱ्या

# प्रथिनांची ताकद

प्रथिन हे एक आवश्यक मॅक्रोन्युट्रियंट असून ते आपल्या समतोल आहाराचा आधारस्तंभ आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

प्रथिन हे एक आवश्यक मॅक्रोन्युट्रियंट असून ते आपल्या समतोल आहाराचा आधारस्तंभ आहे असे म्हणण्यास हरकत नाही. शरीराची वाढ, ताकद व एकूण आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व वयोगटातील भारतीयांना प्रथिने अपरिहार्य का आहेत व आपल्या पारंपरिक पदार्थांमधून प्रथिने मिळवण्यासाठी काय वेगळे पर्याय निघू शकतात ते पाहू.

शिशु व बाल्यावस्था-शिशु व बाल्यावस्था या शारीरिक व मानसिक वाढीच्या सुरवातीच्या काळात प्रथिने ही मूलभूत गरज आहे. मातेच्या दूधाला नेहमी 'द्रव सोन्या'ची उपमा दिली जाते आणि हे शिशुंसाठी उत्तम प्रतीचे नैसर्गिक प्रथिन आहे. संपूर्ण वाढ व रोगप्रतिकार शक्तीसाठी आवश्यक असणाऱ्या अमिनो सिड्सचा हा स्रोत आहे.मुले आहार घेण्यास सुरवात करतात, तेव्हा त्यांच्या आहारातील प्रथिनयुक्त भारतीय प्रमुख अन्न डाळी, कडधान्ये, दही इत्यादी त्यांच्या शारीरिक व मानसिक योग्य व जलद वाढीसाठी आवश्यक प्रथिने, ऊर्जा देण्याचे काम करतात.

पौगंडावस्था-पौगंडावस्थेत मुलांची झपाट्याने वाढ होत असते, हालचाल-चपळता वाढलेली असते. अशा वेळी त्यांच्या स्नायू व हाडांच्या बळकटीसाठी व हार्मोन्सच्या वाढीसाठी प्रथिनांखेरीज पर्याय उरत नाही. भारतीय पारंपरिक पदार्थ राजमा, हरभरा, मोडाचे मूग व कडधान्ये, सोयाबिन्सचे पदार्थ ही उत्तम प्रकारची वनस्पतिजन्य प्रथिने आहेत. मांसाहारींसाठी मासे, कोंबडी यासारखे चरबीरहित मांस, अंडी हे योग्य वाढ होण्यासाठी चांगल्या प्रतीची आवश्यक प्रथिने पुरवतात.तारुण्य-तारुण्यात स्नायूंची बळकटी, निरोगी चलनवलन व तृप्तता यासाठी प्रथिने निर्णायक भूमिका सुरूच ठेवतात. भारतीय खाद्यपदार्थ खाण्यातील आवडी-निवडीप्रमाणे असंख्य प्रथिनयुक्त व्यंजनांचा खजिना उघडतात. डाळी, कडधान्ये, विविध



शेंगा हे बऱ्याच घरांमधील प्रमुख जेवण असते, तर तंदुरी चिकन, फिशकरी, अंडाभुर्जी यासारखे पदार्थ प्राणिजन्य चवदार प्रथिने पुरवतात.

गर्भधारणा व स्तनपान-गर्भाची वाढ, मातेच्या स्नायूंचे प्रसरण व दुधाच्या निर्मितीसाठी गर्भधारणा व स्तनपान या काळात शरीर जास्त प्रमाणांत प्रथिनांची मागणी करते. पारंपरिक भारतीय ज्ञानानुसार या काळात जास्त पौष्टिक आहाराची गरज असते. डाळींचे सूप, पालक पनीर, भाजलेले दाणे व बिया यांना जास्त महत्त्व आहे. यामुळे गर्भाच्या व मातेच्या आरोग्यासाठी आवश्यक असणारी अमिनो-सिड्स तसेच जीवनसत्त्वे व क्षार पुरवले जातात.



उलगडला जातो. डाळी, दही, पनीर, सुकामेवा यांबरोबरच व्हे-प्रथिन, वनस्पतीजन्य


प्रौढत्व-प्रौढत्वामध्ये स्नायूंची बळकटी व हाडांची घनता व्यवस्थित टिकवणे आपल्या हालचालीसाठी व पर्यायाने स्वातंत्र्यासाठी अग्रस्थानी होते. वयामुळे होणारी स्नायू-क्षती वाचवण्यासाठी व एकूण आरोग्यासाठी प्रथिनयुक्त आहारावर भर देणे महत्त्वाचे मानले जाते. पारंपरिक भारतीय आहारात प्रौढांसाठी उपयुक्त प्रथिनयुक्त आहाराचा खजिनाच

प्रथिन पावडर हेदेखील प्रौढांना पोषण-गरजांच्या पूर्ततेसाठी मदत करतात. शाकाहारी व मांसाहारी दोन्ही प्रकारच्या लोकांसाठी भारतीय पदार्थांत प्रथिनयुक्त यादीच दिली आहे. डाळी, धान्ये, कडधान्ये, दुग्धजन्य पदार्थ, सुकामेवा, बिया आणि चरबीविरहित मांस ही सर्व उत्तम प्रथिनांची भारतीय स्वयंपाकघरात आढळणारी उदाहरणे आहेत. या पदार्थांचा दैनंदिन आहारात समावेश केल्यास संपूर्ण आरोग्य व वेल-बिईंगसाठी आवश्यक असणारी अमिनो सिड्स व पोषणतत्त्वे मिळतात.

यामध्ये एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवायला हवी, की डाळी व कडधान्यांत विशिष्ट प्रकारच्या अमिनो सिड्सचा अभाव असतो- जे भात, भरडधान्य, गहू यासारख्या कर्बोदकीय पदार्थांत उपलब्ध असतात. त्यामुळे डाळ-भातासारखा पारंपरिक भारतीय पदार्थ महत्त्वाचे मिश्रण आहे. प्रत्येक वयोगटातील भारतीयांसाठी आरोग्यदायी पोषणतत्त्वांचा भक्कम पाया रचणाऱ्या मॅक्रोन्युट्रियंट्समध्ये प्रथिने हा अनिवार्य घटक आहे. आपल्या दैनंदिन आहारात विविध प्रथिनयुक्त आहाराचा समावेश करून आपण आपल्या पोषण गरजा भागवून पौष्टिक व चैतन्यपूर्ण जीवन जगू शकतो.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

**शिंकताना किंवा खोकताना लघवी होत असेल तर असू शकतो हा आजार...**



अत्यधिक कॉफीचे सेवन केल्यास. धूम्रपानाची सवय असल्यास. उपचार-हा आजार दीर्घकाळापासून असल्यास वैद्यकीय सल्ला घेणे नितांत आवश्यक आहे. मूत्राशयाच्या व्यायामांपासून ते ऑपरेशनपर्यंतचे पर्याय उपलब्ध आहे.डॉक्टर रुग्णाला जीवनशैलीत सुधारण्याचा सल्ला देतात. धूम्रपान न करणे आणि जास्त कॉफी न पिण्याचा सल्ला दिला जातो. स्नायूंना बळकट करण्यासाठी व्यायाम शिकवले जातात. यांना पेल्विक फ्लोर स्नायूंचे प्रशिक्षण व्यायाम असे म्हणतात.(**क्रमशः**)


## २ Joke — विनोद




**मोहन : काळ्या पेनने तांबडे लिहून दाखव.**

**अनिल : अशक्य आहे. मोहनने आपले काळे पेन काढून ! तांबडे असा शब्द लिहिला.**

## ३ Message — संदेश



Santa: mera beta meri baat sunta hi nahi hai

Banta: kyu? itna gamandi hai kya?

Santa: nahi. woh behara hai.

## ४ Thought — सुविचार



माझ्या शब्दकोशातून ङ्गअशक्यफ या शब्दास मी काढून टाकलेले आहे.


– नेपोलियन

**संस्कृत सुभाषित**

अनिर्वेदेन दीर्घेण निश्चयेन ध्रुवेण च
देवदेवप्रसादाच्च क्षिप्रं फलम्वाप्यते ।।
(शांतीपर्व, अध्याय १५३, ेक ११७, महाभारत)

अर्थ – दीर्घोद्योगाने, दृढनिश्चयाने व ईश्वरी कृपेने सत्वर कार्यसिद्धी होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. आराम करण्याचे सणवार? (वाक्प्रचार)
१०. छोटे कुबड
१२. पुरुष
१३. निवासस्थान
१४. रमापती
१५. जेमतेम, मोठ्या मुष्किलीने
१७. एक पालेभाजी
१९. कामावर बहिष्कार
२०. आंब्याचे रोप
२२. भीती, वचक
२३. अकस्मात, पूर्वकल्पना नसताना
२४. शिऱ्यातील प्रमुख पदार्थ
२५. निपचिप
२७. नशीब, काम
२८. फजिती, टवाळी
३०. प्रयत्न
३१. रममाण, निमग्न
३२. काम टाळणारा
३४. रेशमी धोतर
३७. घाण पाणी
४०. विनंती
४२. गर्व, ताठा
४३. रोगप्रतिबंधक द्रव
४५. गारा
४६. वानवा, उणीव
४८. घराची सजावट
५०. विद्यार्थ्यांचे राहण्याची जागा
५२. वैताग, नाकी आणलेला दम!
५४. पंख
५६. खून, वध
५८. बोलविणे
५९. अपवित्र
६२. सहाय्य
६४. सूर्याचा मंत्र
६५. परिस्थितीला अचानक मिळालेले वळण
६६. छाटणे
६७. आश्चर्य
६८. कर भरण्याची योग्यता
७०. दुर्लक्ष, हेळसांड
७२. चिक्कू माणूस
७३. नवीन
७४. लोकांचे राज्य
७६. साईबाबांची उक्ती
७९. मोठे गाव
८०. अवलोकन
८१. नजरफेक

### उभे शब्द

१. सूर्य
२. उत्तराधिकार
३. प्रत्येक वर्ष
४. श्रीरामाचे एक नाव
५. पराभव
६. पचनास सहाय्य करणार पदार्थ
७. गुन्हा
८. पूर्ण भरतीचे वेळ
९. उद्धट, अरेरावी करणारा मनुष्य
११. गुरांचा जमाव
१६. निरर्थक बडबड
१७. गडीमाणसे
१८. वरपांगी
१९. संभाव्य धोका
२१. हिंदीतील आढेवेढे
२२. दोरा
२४. कांती, तेज
२६. ऱ्हास
२९. जीभ
३०. पंतप्रधान
३३. कावळ्याचे ओरडणे
३५. करुणा, कीव
३६. भांडण
३८. वर्तमानपत्रातील कप्पा
३९. सभेची जागा
४१. रानभूल
४४. जळाऊ लाकूड
४६. पुष्कळ
४७. वाहून नेणे
४८. कायदा-सुव्यवस्थेला जबाबदार मंत्री
४९. खंदक
५१. मनाला टोचणारे दुःख
५३. श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदाभेद
५५. अलमारी
५७. मीठ (हिंदी)
५८. जमाखर्च
५९. गटार
६०. भरपूर मार देणे, चोपणे (वाक्प्रचार)
६१. 'गपापा' होणारा ऐवज!
६३. तुकडी, पाकळी
६५. कोलकाताचे जुने नाव
६७. डोळे,६९. संकटातून पार करणारा
७०. निराश
७१. मोठा आवाज
७३. अपऱ्या नाकाचा
७५. पडसे,७६. च्या बरोबर
७७. प्रेम की पैसा?
७८. पहिला आकडा

### आडवे उत्तर

१.दिवाळी दसरा हातपाय पसरा १०.पोक १२.नर १३.घर १४.रमावर १५.कसाबसा १७.चाकवत १९.संप २०.कलम २२.धाक २३.अचानक २४.रवा २५.गपगार २७.कर्म ३०.प्रयास ३१.रत ३२.चुकार ३४.कद ३७.नरकवणी ४०.याचना ४२.नक्षा ४३.लस ४५.कारका ४६.अभाव ४८.गृहरचना ५०.वसतिगृह ५२.वात ५४.पर ५६.हनन ५८.आमंत्रण ५९.नापाक ६२.मदत ६४.गायत्री ६५.कलाटणी ६६.कलम ६७.नवल ६८.करपात्रता ७०.हयगय ७२.कद्रू ७३.नव ७४.जनसत्ता ७६.सबका मालिक एक ७९.शहर ८०.पाहणे ८१.कटाक्ष

### उभे उत्तर

१.दिनकर २.वारसा ३.दरसाल ४.राघव ५.हार ६.पाचक ७.परत ८.समा ९.रावणाचा लेक ११.कळप १६.बकवास १७.चाकरचुकर १८.वरकरणी १९.संकट २१.मगर २२.धागा २४.रया २६.पतन २९.रसना ३०.प्रधानमंत्री ३३.कावकाव ३५.दया ३६.कलह ३८.रकाना ३९.सभागृह ४१.चकवा ४४.सरपण ४६.अति ४७.वहन ४८.गृहमंत्री ४९.चर ५१.सल ५३.तरतमभाव ५५.कपाट ५७.नमक ५८.आयव्यय ५९.नाला ६०.कणीक तिंबणे ६१.हपापाचा माल ६३.दल ६५.कलकत्ता ६७.नयन ६९.तारक ७०.हताश ७१.गजर ७३.नकटा ७५.सर्दी ७६.सह ७७.माया ७८.एक



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### इंग्लंडच्या लॉर्ड्ससह पाकिस्तानच्या गद्दाफी स्टेडियमवर कारवाई,

नवी दिल्ली–आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद ने लंडनमधील ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदान आणि पाकिस्तानातील गद्दाफी स्टेडियम येथे झालेल्या सामन्यांसाठी वापरण्यात आलेल्या खेळपट्ट्यांवर कठोर कारवाई केली आहे. सामनाधिकारी यांच्या अहवालानंतर दोन्ही मैदानांवरील खेळपट्ट्यांना असमाधानकारक अशी रेटिंग देण्यात आली असून प्रत्येकी एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे.
कोणत्या सामन्यांवर झाली कारवाई?
लॉर्ड्स मैदानावर इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्याची खेळपट्टी, तसेच लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममध्ये पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्याची खेळपट्टी आयसीसीच्या तपासणीत अपयशी ठरली. या दोन्ही सामन्यांचे रेफरी अनुक्रमे अँडी पायक्रॉफ्ट आणि ग्रॅमी ला ब्रॉय होते. त्यांनी खेळाडू, कर्णधार आणि पंचांकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे आयसीसीकडे अहवाल सादर केला. लॉर्ड्सची खेळपट्टी का ठरली वादग्रस्त? कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाज आणि गोलंदाज यांच्यात समतोल असणे अपेक्षित असते.

### एशिया गेम्स२०२६ साठी पाकिस्तानचा संघ जाहीर!

दिल्ली–पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ साठी १५ सदस्यीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा सप्टेंबर–ऑक्टोबरदरम्यान जपानमध्ये खेळवले जाणार आहेत. तर पुरूषांचे क्रिकेटमधील सामने २४ सप्टेंबरपासून खेळवले जातील, तर मेडलचे सामने ३ ऑक्टोबरपासून खेळवले जाणार आहेत. पाकिस्तान संघाचं नेतृत्त्व या स्पर्धेत नवा खेळाडू करणार आहे. तर बाबर आझम व शाहीन आफ्रिदी यांना या संघातून वगळलं आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धासाठी १५ सदस्यीय पाकिस्तान संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी साहिबझादा फरहान याच्याकडे सोपवण्यात आली असून अब्दुल समद याची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संघात अशा चार खेळाडूंचा समावेश आहे, ज्यांना अद्याप पाकिस्तानकडून टी–२० आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधीही मिळालेली नाही. यात आकिफ जावेद, अली रझा, माझ सदाकत आणि साद मसूद यांचा समावेश आहे. नवा कर्णधार साहिबजादा फरहानने नुकत्याच पार पडलेल्या २०२६ टी–२० विश्वचषकात सर्वाधिक धावा करत पाकिस्तानला सुपर–८ फेरीपर्यंत मजल मारून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

### फिफा विश्व चषक २०२६ साठी किती प्राईच मनी मिळणार?

मुंबई–फिफा वर्ल्ड कपच्या २३ व्या सीजनला येत्या ११ जून पासून सुरुवात होणार आहे. यंदा ही स्पर्धा अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या देशांमध्ये आयोजित करण्यात आली असून यात एकूण ४८ संघांचा सहभाग आहे. यंदाचा वर्ल्ड कप हा इतिहासातील दुसरा सर्वात महागडा वर्ल्ड कप आहे. यात सहभागी झालेल्या संघांना प्रत्येकी ४–४ च्या ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आलं असून ग्रुप स्टेजमध्ये एकूण १२ ग्रुप आहेत. तर यंदाची प्राईज मनी ही फिफा वर्ल्ड कप २०२२ च्या तुलनेत ४९ टक्क्यांनी जास्त आहे. आज आपण फुटबॉल वर्ल्ड कप आणि क्रिकेट वर्ल्ड कपच्या प्राईज मनीपैकी कोणत्या स्पर्धेच्या विजेत्या संघाची प्राईज मनी ही सर्वात जास्त आहे.जगातील सर्वात मोठा स्पोर्ट इव्हेंट हा फिफा वर्ल्ड कप असून याचं आयोजन हे १ जून ते १९ जुलै दरम्यान होणार आहे. १९ जुलै रोजी या स्पर्धेचा अंतिम सामना पार पडेल. तर दुसरीकडे आयसीसी महिला टी २० क्रिकेट स्पर्धेला सुद्धा १२ जून पासून सुरुवात होणार आहे. ही स्पर्धा यंदा इंग्लंडमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

### मुंबई इंडियन्सच्या 'या' १९ वर्षीय खेळाडूचा थेट इशारा

मुंबई–अफगाणिस्तानचा संघ सध्या भारत दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये एकमेव कसोटी सामन्याचा थरार रंगला. या सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद करुन मालिका खिशात घातली. कसोटी मालिकेनंतर आता दोन्ही संघ ३ वनडे सामन्यांची मालिका खेळण्यासाठी आमनेसामने येणार आहेत. या मालिकेत अफगाणिस्तानकडून मुंबई इंडियन्सचा १९ वर्षीय स्टार फिरकी गोलंदाज अल्लाह गजनफर देखील खेळताना दिसून येणार आहे. अल्लाह गजनफरने मुंबई इंडियन्सकडून खेळत असताना रोहित शर्मासारख्या अनुभवी गोलंदाजाला नेट्समध्ये गोलंदाजी केली आहे. या अनुभवाचा फायदा भारताविरुद्ध खेळताना होऊ शकतो, असं अल्लाह गजनफर म्हणाला आहे.
भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील ३ वनडे सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना १३ जूनला धरमशालेच्या मैदानावर खेळवला जाणार आहे.
या सामन्याआधी माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत अल्लाह गजनफर म्हणाला, मफ्रोहित एक दिग्गज आणि उत्तम फलंदाज आहे. तो डावाची सुरुवात करण्यासाठी येतो आणि मी नवीन चेंडून गोलंदाजी करतो.

# भारत देशातल्या फुटबॉल मार्केटला नवी संजीवनी मिळणार?


मुंबई–क्रीडाजगताचा महामेळा असे वर्णन होणारा फुटबॉल वर्ल्डकप अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने देशातल्या फुटबॉल मार्केटला संजीवनी मिळणार आहे.
भारतात फुटबॉल व्ह्यूअरशिप किती आहे?
क्रिकेटची देशातली लोकप्रियता अनन्यसाधारण आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात क्रिकेट पाहिलं जातं. व्ह्यूअरशिपच्या बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर फुटबॉलचा नंबर आहे. केपीएमजीने गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात मांडलेल्या अहवालानुसार भारतात ३०० मिलिअन फुटबॉल प्रेक्षक आहेत. क्रिकेटच्या व्ह्यूअरशिप आकड्याच्या निम्म्यापेक्षा थोडाच कमी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील आकडेवारीचा विचार केला तर हा आकडा कमी आहे. मात्र तरीही २०१८ ते २०१५ या कालावधीत देशांतर्गत फुटबॉलची लोकप्रियता २५ टक्क्यांनी वाढली आहे. याच काळात क्रिकेटची लोकप्रियता ३८ टक्क्यांनी वाढली आहे. लीगचा विचार केला तर बाकी खेळांच्या तुलनेत फुटबॉलच्या लीग खूपच मागे आहेत. इंडियन सुपर लीग ही स्पर्धा दिमाखात सुरू झाली. मात्र तिला अपेक्षित लोकाश्रय मिळू शकला नाही. इंडियन प्रीमिअर लीग, वूमन्स प्रीमिअर लीग आणि प्रो कबड्डी लीग या यशस्वी लीगच्या तुलनेत आयएसएल कुठेच दिसली नाही.
या माध्यमातून किती पैसा खेळतो आहे?



फुटबॉलच्या व्ह्यूअरशिपचे आकडे घटते असल्याने आणि डोमेस्टिक लीगचं बेतास बेत अस्तित्व यामुळे यामध्ये गुंतवणूक करण्यास फारसं कुणी उत्सुक नसतं. झी एंटरटेनमेंटने फिफाच्या स्पर्धासाठीचे प्रक्षेपण हक्क मिळवले. २०३४ पर्यंतच्या स्पर्धासाठीचे हक्क ३० मिलिअन डॉलर्स एवढी मोठी रक्कम खर्च करून झी ने पटकावले आहेत. मूळ स्पर्धेच्या तुलनेत आता जीव छोटा करण्यात आलेल्या आयएसएल स्पर्धेच्या प्रक्षेपणाचे हक्क फक्त ९ कोटींनी विकण्यात आले होते. यंदाचा आयएसएलचा हंगाम प्रदीर्घ विलंबाने सुरू झाला. अखिल भारतीय फुटबॉल महासंघ आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या फुटबॉल स्पोर्ट्स डेव्हलपमेंट लिमिटेड यांच्यात बेबनाव झाल्याचा याला फटका बसला. देशातली फुटबॉल आवडणारी जनता प्रामुख्याने केरळ, गोवा आणि पश्चिम बंगाल इथे आहे.
फिफाच्या व्ह्यूअरशिपवर याचा परिणाम होईल का?
कदाचित हो. फुटबॉल वर्ल्डकपचे सामने अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोत होणार आहेत. त्यामुळे भारतीय प्रमाणवेळेनुसार हे सामने रात्रीच असणार आहेत. यामुळेच स्पर्धेचे प्रक्षेपण हक्क विकत घेण्यासाठी वाहिन्या उत्सुक नव्हत्या. दरम्यान झी समूहाने नवी क्रीडा वाहिनी सुरू केली आहे. ळहगू८ असं या वाहिनीचं नाव आहे. आवाका लक्षात घेऊन त्यांनी झी५ या ओटीटी प्लॅटफॉर्मचं बॅकएन्ड मजबूत केलं आहे. फुटबॉल वर्ल्डकपच्या निमित्ताने देशातली फुटबॉल पाहणाऱ्यांची संख्या वाढेल असा विश्वास झी समूहाला आहे. म्हणूनच त्यांनी अशी गुंतवणूक केली आहे.
देशातल्या फुटबॉलसाठी हा वर्ल्डकप संजीवनी ठरू शकतो का?
क्रिकेटवेड्या देशात फुटबॉल ही नव्याने उदय होऊ पाहणारी बाजारपेठ आहे. २०२४–२५ उदयोन्मुख खेळांच्या मार्केटमध्ये २०० कोटींची गुंतवणूक झाली आहे. जिओहॉटस्टार चॅनलच्या एकूण व्ह्यूअरशिपमध्ये फुटबॉलचा वाटा अवघा १ टक्के एवढा आहे. ओटीटीवर हे प्रमाण १.१ एवढं आहे. आयएसएल सुरू होण्यास विलंब होऊनही या आकडेवारीत घट झालेली नाही. डोमेस्टिक लीगचं नूतनीकरण होणं आवश्यक आहे.
फुटबॉलच्या प्रसारासाठी काय करता येईल?

# एकदिवसीय विश्वचषक विजयामुळे आत्मविश्वास वाढला : जेमिमा

बर्मिंगहॅम : गेल्या वर्षी महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय संघाचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या उंचावला आहे. त्यामुळे आगामी महिला टी–२० विश्वचषकात भारतीय संघ चांगली कामगिरी करेल, असा विश्वास भारताची स्टार फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जने व्यक्त केला. महिला टी–२० विश्वचषक १२ जून रोजी इंग्लंडमध्ये सुरू होत आहे. भारतीय संघ रविवारी बर्मिंगहॅममध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. न्यूझीलंडने २०२४ चा विश्वचषक जिंकला होता, त्यांनी अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले होते. भारताला ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, बांगलादेश आणि नेदरलँड यांच्यासोबत 'अ' गटात स्थान देण्यात आले आहे. या गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. या विषयी बोलताना जेमिमा म्हणाली, एकदिवसीय विश्वचषक विजयाच्या यशात प्रत्येकजण सहभागी होता. दबाव कसा असतो हे प्रत्येकाला माहीत



आहे. आम्ही हे एकदा केले आहे आणि पुन्हा करू शकतो, असे जेमिमाने जिओस्टारच्या 'चॅम्पियन्स हडल' कार्यक्रमात सांगितले. प्रत्येकामध्ये हा आत्मविश्वास आहे. एकदा आम्ही विजेतेपद मिळविले की, संघाची भूक वाढते आणि आता केवळ एकच नाही, तर अनेक ट्रॉफी जिंकण्याचे ध्येय आहे.



# हार्दिक आणि रोहित अफगाणिस्तानच्या एकदिवसीय मालिकेत

## सेंटर ऑफ एक्सलन्सकडून दोघांना परवानगी

मुल्लानपूर : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसी–सीआय) सेंटर ऑफ एक्सलन्सच्या (सीओई) क्रीडा विज्ञान पथकाने स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या आणि ज्येष्ठ फलंदाज रोहित शर्मा यांना रविवारी धरमशाला येथे सुरू होणार्या अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत खेळण्यासाठी परवानगी दिली आहे.
दुखापतींमुळे हार्दिक आणि रोहित मुंबई इंडियन्सचे अनेक आयपीएल सामने खेळू शकले नाहीत. हार्दिकला पाठीच्या स्नायूंचा त्रास होता, तर रोहितला हॅमस्ट्रिंगचा ताण होता. हार्दिक २ जूनपासून बंगळुरु येथील सीओईमध्ये आहे. पुढील पाच दिवसांत, त्याने सामन्यासारख्या विविध परिस्थितीत सराव केला. त्याने १० षटके (त्याचा पूर्ण कोटा) गोलंदाजीही केली. त्यावेळी त्याला कोणतीही अडचण आली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, सीओई येथील स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग प्रशिक्षकाने विविध निकषांवर त्याची तंदुरुस्ती प्रमाणित करण्यात आली आहे, असे सूत्रांनी सांगितले.माजी कर्णधार रोहित शर्मा देखील हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे तपासणीसाठी सीओईमध्ये होता. त्याच्या देखील तपासणीनंतर त्याला खेळण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. याबाबत बोलताना भारताचे सहाय्यक प्रशिक्षक सितांशु कोटक म्हणाले की, त्यांच्याकडे हार्दिकच्या तंदुरुस्तीबद्दल कोणतीही अद्ययावत माहिती नसली तरी, हा अष्टपैलू खेळाडू ठीक आहे, असा त्यांचा विश्वास आहे. हार्दिक हा भारतासाठी मर्यादित षटकांच्या संघासाठी एक महत्त्वाचा खेळाडू आहे. जो आपल्या वेगवान गोलंदाजीने आणि अखेरच्या षटकांमध्ये आक्रमक फलंदाजीने संघाला संतुलन देतो. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे हार्दिक सराव सत्रांमध्ये १० षटके गोलंदाजी करत आहे. याचा अर्थ तो ५० षटकांच्या क्रिकेटमधील आव्हानांसाठी तयार आहे. हार्दिक चंदीगडमधील सराव सत्रासाठी संघात सामील होईल की नाही, हे अद्याप अस्पष्ट आहे. पूर्वीच्या नियोजनानुसार तो थेट धर्मशाळा येथे जातील.

# फुटबॉलच्या मैदानात वैभव सूर्यवंशीसारखाच १५ व्या वर्षी पदार्पण

मुंबई–क्रीडा जगतात सध्या दोन तरुण खेळाडूंच्या नावाची आणि कामगिरीची जोरदार चर्चा सुरु आहे. एका बाजूला भारताचा अवघ्या १५ वर्षांचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडत थेट टीम इंडियाच्या वरिष्ठ संघात स्थान मिळवले आहे. वैभवने क्रिकेट जगतात नवा इतिहास रचला असतानाच, दुसऱ्या बाजूला फुटबॉलच्या मैदानातही एका १८ वर्षांच्या पोराने धुमाकूळ घातला आहे. त्याचे नाव आहे लामिन यामल. अवघ्या १८ व्या वर्षी त्याने जगभरातील फुटबॉल चाहत्यांना आणि दिग्गजांना भुरळ पाडली

# लाल चेंडूचे क्रिकेट माझ्यासाठी सर्वस्व

मुल्लानपूर : कसोटी क्रिकेट हेच माझ्यासाठी सर्वोच्च आहे. माझी गोलंदाजी अधिक चांगली होण्यासाठी, मी आयपीएलच्यावेळी देखील लाल चेंडूनेच सराव करत होतो, कारण लाल चेंडूचे क्रिकेट माझ्यासाठी सर्वस्व आहे, असे मत फिरकी गोलंदाज मानव सुथार याने स्पष्ट केले.तेवीस वर्षीय मानव सुथारने आपल्या पहिल्याच कसोटी सामन्यात चमकदार कामगिरी करत पहिल्या डावात ३३ धावांत सहा विकेट्ससह सात बळी घेतले. त्याच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर भारताने अफगाणिस्तानचा एक डाव आणि ३०० धावांनी पराभव



करून कसोटीत आपला सर्वात मोठा विजय नोंदवला.
याबाबत बोलताना मानव म्हणाला, ज्या दिवसापासून मी खेळायला सुरुवात केली आणि जसजशी मी प्रगती करत गेलो, तेव्हापासून लाल चेंडू क्रिकेट माझ्यासाठी सर्वस्व राहिले आहे. म्हणून मी अंडर–१९ क्रिकेट खेळत होतो. रणजी ट्रॉफी माझे नेहमीच प्राधान्य राहिले आहे. कुलदीप यादव याच्याकडून प्रथम कॅप घेताना त्यांनी सांगितलेले शब्द माझ्यासाठी खूप प्रेरणादायी होते. संघातील प्रत्येकाने मला खूप प्रोत्साहन आणि प्रेरणा दिली, असे त्याने स्पष्ट केले.
जेव्हापासून मी खेळायला सुरुवात केली तेव्हापासून मी भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळावे हे माझे, माझ्या वडिलांचे आणि प्रत्येकाचे स्वप्न होते. कसोटी क्रिकेट खेळण्याच्या संधी मिळाली तर तयार राहण्यासाठी मी आयपीएल दरम्यान लाल चेंडूने सराव करत होतो. जेव्हा माझे नाव संघात आले, तेव्हा मी कसा खेळू याचा विचार करत होतो, असे मानव सुथार याने सांगितले.

# लेडी धोनीने इंग्लंडच्या तोंडचे पाणी वळवले





मुंबई–आयसीसी वुमेन्स वर्ल्ड कप २०२६ च्या स्पर्धेला सूरू होण्यास अवघ्या २ दिवसांचा कालावधी शिल्लक असताना टीम इंडियाच्या बंगाली वाघिणीने आज गर्जना केली होती. तिची ही गर्जना इतकी जबरदस्त होती की एक हाती मॅच फिरवत जवळ जवळ इंग्लंडच्या तोंडचे पाणी पळवलेच होते,पण शेवटच्या क्षणी एक घात झाला आणि टीम इंडियाचा पराभव झाला होता. दरम्यान टीम इंडिया जिंकणारी मॅच नेमकी कशी हारली? हे जाणून घेऊयात.
खरं तर इंग्लंडच्या टीमने दिलेल्या १७१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाची सूरूवात खूपच खराब झाली होती. कारण स्मृती मानधना अवघ्या १ धावांवर बाद झाली होती. त्याच्यानंतर शेफाली वर्मा १३ आणि यास्तिका भाटीया १५ वर बाद झाली होती. तिच्या पाठोपाठ हरमनप्रीत कौर १७ आणि भारती फुलमाली १८ धावांवर बाद झाली होती. त्यामुळे टीम इंडियाचे ८७ धावांवर ५ विकेट पडले होते.
टीम इंडियाचे धडाधड पडलेले विकेट पाहता टीम इंडिया हा सामना हारेल असे वाटत होते.पण इतक्यात विकेटकिपर रिचा घोषची मैदानात एंन्ट्री झाली. तिने मैदानात हळूहळू सामना फिरवायला सूरूवात केली होती. रिचा ज्यावेळेस मैदानात आली तेव्हा टीम इंडियाच्या १४ ओव्हरला १०० धावा झाल्या होत्या.आता टीम इंडियाचा जिंकण्यासाठी ३६ बॉलमध्ये ७२ धावांची गरज होती.अशावेळेस रिचाने एका बाजूने भारताचा डाव सावरत सामना फिरवायला सूरूवात केली होती. पण त्याचवेळेस एका बाजूने भारताचे विकेट पडत होते. त्यात सूरूवातीचे काही ओव्हर्स भारताला जास्त धावा काढता आल्या नाही. पण १९ व्या ओव्हरला रिचाने २१ धावा काढल्या. त्यामुळे शेवटच्या ओव्हरला भारताला १७ धावा हव्या होत्या.त्यावेळी पहिल्या तीन बॉलवर ११ धावा आल्या होत्या. आता पुढच्या तीन बॉलवर ६ धावा हव्या होत्या. यावेळी इंग्लंडने रिचा घोषला ट्रॅपमध्ये फसवून तिला स्टंम्पआऊट केले. इकडेच सगळी मॅच फिरली. रिचा घोष यावेळी ३६ बॉलमध्ये ६८ धावा करून बाद झाली.त्यामुळे रिचा घोष धोनीसारखी खेळली. धोनी देखील अशाचप्रकारे शेवटच्या ओव्हरपर्यंत मॅच नेऊन सामना जिंकवायचा. रिचाने देखील हाच प्रयत्न केला होता पण ती अपयशी ठरली. त्यानंतर रेणुका सिंहने मोठा शॉर्ट खेळून भारताला सामना जिंकवण्याचा प्रयत्न केला होता. पण ती कॅच आऊट झाली. तिकडेच भारताचा डाव १६६ धावांवर ऑलआऊट झाली

# २०२६ मध्ये होणाऱ्या फिफा विश्वचषकातील बरेच बदल

न्यूयॉर्क : १९९४ मध्ये अमेरिकेत झालेला पहिल्या फिफा विश्वचषक अमेरिका फक्त अमेरिकेतच आयोजित करण्यात आला होता. २०२६ मध्ये अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा यांच्या संयुक्त विद्यमाने हा विश्वचषक आयोजित करण्यात आला आहे. मात्र, १९९४ ते २०२६ यातील आयोजनात लक्षणीय बदल दिसून येत आहेत. ११ जून ते १९ जुलै २०२६ दरम्यान होणारी ही स्पर्धा आकार, तिकिटांच्या किमती आणि सुविधांच्या बाबतीत आतापर्यंतचा सर्वांत मोठा विश्वचषक असेल.
संघांची वाढलेली संख्या
१९९४ च्या विश्वचषकात २४ संघांची शेवटची स्पर्धा होती. त्यानंतर १९९८ मध्ये संघांची संख्या ३२ पर्यंत वाढली. २०२६ मध्ये पहिल्यांदाच ४८ संघ सहभागी होणार आहेत. नवीन स्वरूपामुळे, विजेत्या संघाला आता सातऐवजी आठ सामने खेळावे लागतील.
मैदानाचा आकार
१९९४ ला फिफाने मैदानाची लांबी १०५ मीटर आणि रुंदी ६८ मीटर निश्चित केली होती; परंतु स्टेडियमना निर्धारित मापांपेक्षा लहान मैदाने ठेवण्याची परवानगी होती. २०२६ मध्ये सर्व मैदाने फिफाच्या मानकांनुसार बांधण्यात आली आहेत.
प्रेक्षकांची संख्या
१९९४ च्या विश्वचषकातील ५२ सामन्यांना एकूण ३५.९ लाख प्रेक्षकांनी हजेरी लावली होती, जो त्यावेळचा एक विक्रम होता. २०२६ मध्ये सामन्यांची



संख्या वाढल्यामुळे, ६० ते ७० लाख प्रेक्षक अपेक्षित आहेत.
भौगोलिक व्याप्ती
१९९४ मध्ये संपूर्ण स्पर्धा अमेरिकेतील नऊ स्टेडियममध्ये खेळवण्यात आली होती. २०२६ ला हीच स्पर्धा तीन देशांमध्ये आयोजित केली जाईल. १६ स्टेडियम वापरले जातील, ज्यात अमेरिकेतील ११, मेक्सिकोमधील तीन आणि कॅनडातील दोन स्टेडियमचा समावेश असेल. उपांत्यपूर्व फेरीपासून अंतिम फेरीपर्यंतचे सर्व सामने अमेरिकेत आयोजित केले जातील.
पाण्यासाठी विश्रांती–१९९४ मध्ये उष्ण आणि दमट हवामान असूनही, सामने कोणत्याही विशेष विश्रांतीशिवाय खेळले गेले. २०२६ मध्ये प्रत्येक हाफमध्ये तीन मिनिटांचा पाणी पिण्याचा ब्रेक असेल. प्रशिक्षकांना खेळाडूंना डावपेच समजावून सांगण्यासाठीही या वेळेचा उपयोग करता येईल.
बदली खेळाडू–१९९४ मध्ये एक संघ जास्तीत जास्त दोन खेळाडू बदलून खेळवू शकत होते, आणि विशेष परिस्थितीत गोलकीपर बदलण्याचीही परवानगी होती. २०२६ मध्ये मात्र, प्रत्येक संघ पाच खेळाडू बदलू शकेल. अतिरिक्त वेळेत सहावा बदल जोडला जाईल. डोक्याला दुखापत झाल्यास एक वेगळा बदल करण्याची परवानगी असेल.
तिकिटांच्या किमती प्रचंड वाढल्या
१९९४ मध्ये पहिल्या फेरीच्या तिकिटांची किंमत २५ डॉलर ते ७५ डॉलर होती, तर अंतिम फेरीच्या तिकिटांची किंमत १८० डॉलर ते ४७५ डॉलर होती. २०२६ मध्ये पहिल्या फेरीच्या तिकिटांची किंमत १४० डॉलरपासून सुरू होऊन दोन हजार ७३५ डॉलरपर्यंत पोहोचली आहे. अंतिम फेरीची तिकिटे चार हजार १८५ डॉलर ते आठ हजार ६८० डॉलरमध्ये विकली गेली, आणि नंतर कमाल किंमत दहा हजार ९९० डॉलरपर्यंत वाढली. यावेळी, 'डायनॅमिक प्राइसिंग' प्रणाली देखील लागू करण्यात आली आहे, ज्यामुळे मागणीनुसार तिकिटांच्या किमती बदलू शकतात.

# रेणापूर इथे पर्मनंट सुरक्षा रक्षक भरती ला भव्य प्रतिसाद...



**रेणापूर/प्रतिनिधी:** सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ऍक्ट २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मान्यताप्राप्त , भारत सरकारच्या पसारा मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा. लिमिटेड यांच्या तर्फे दिनांक १० जून ते १४ जून २०२६ पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे. आज ज्या युवकांचे निवड झाली त्यांना लगेच नियुक्ती पत्र देण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा परिषद हायस्कूल च्या मुख्याध्यपिका सौ. वैशाली सारणीकर मॅडम, श्री. अनिल फुलारे, जेष्ठ पत्रकार यांनी युवकांना मार्गदर्शन केले. तसेच हायस्कूल च्या सहशिक्षिका सौ सुनीता पाटील, सौ. वंदना कराड उपस्थित होत्या.

या भरतीस बेरोजगार युवकांना पर्मनंट नोकरीं दिली जाणार आहे. त्याचबरोबर. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या(PMVBRY) अंतर्गत नवीन भरती होणाऱ्या युवकांना नोकरी लागल्यानंतर १५००० रुपये मिळतील. जे पेमेंट व्यतिरिक्त सरळ त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होतील. तसेच इतर सुविधा ज्यामध्ये पी एफ सुविधा, मेडिकल, ग्रॅजुटी, पी एफ पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड किंवा महाराष्ट्र मिनिमम वेज नियमाप्रमाणे पेमेंट मिळणार आहे जे १५ हजार ते २४हजार पर्यंत सुरुवातीस मिळेल व सर्व सूविधा दिल्या जातील. भरती होणाऱ्या तरूणांना महाराष्ट्रामध्ये मध्ये नौकरी दिली जाणार आहे,

ही भरती प्रक्रिया दि.१० जुन ते १४ जून २०२६ पर्यंत सकाळी ८ ते दुपारी१ पर्यंत जिल्हा परिषद हायस्कूल सभागृह, रेणापूर, ता.रेणापूर . जि. लातूर .येथे सुरू राहणार आहे. तरी १४ जून पर्यंत या सुवर्ण संधी चा लाभ जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी लाभ घ्यावा.भरती साठी :पात्रता ❊१)शिक्षण :युवक हा कमीत कमी १० वी पास असावा. २)वय:किमान १८ वर्ष ते कमाल ४५ वर्ष. ३) उंची:१६५सेमी पेक्षा जास्त. ४)वजन ४८किलो पेक्षा जास्त. युवक हा मेडिकली फिट असावा. भरती साठी कागदपत्रे:१)आधार कार्ड झेरॉक्स २) ,१०/१२वी /ग्रॅज्युशन चे मार्कशीट पैकी १ झेरॉक्स. ३) पासपोर्ट साईझ २ फोटो घेऊन येणे.४)रेजिस्ट्रेशन फी ५००रुपये (फक्त निवड होणाऱ्या युवकांसाठी ) या भरतीचा जास्तीत जास्त युवकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भरती अधिकारी महेशकुमार सरतापे, दिग्विजय मोहिते यांनी केले आहे.

# कारचालकावर गुन्हा दाखल

**उदगीर/प्रतिनिधी:** रस्त्याच्या मध्यभागी कार उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी उदगीर शहर पोलिसांत एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ जून रोजी दुपारी सव्वाबाराच्या सुमारास उदगीर येथील पूर्व दिशेला असलेल्या एका सार्वजनिक रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. आरोपीने आपली लाल रंगाची मारुती ओम्नी कार (क्र एमएच ०२ जेपी १४४०) रस्त्याच्या मध्यभागी निष्काळजीपणे उभी केली होती. यामुळे स्वतः च्या व इतरांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिस अंमलदार पद्माकर चिंताकोटे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद असून, पोलिस अंमलदार आमले तपास करीत आहेत.

# विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या २.४५ हेक्टर जागेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीची संयुक्त बैठकीची आ. अभिमन्यू पवार यांची मागणी

**लातूर/प्रतिनिधी:** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर यांच्या नावावर हस्तांतरित करण्यात आलेल्या २.४५ हेक्टर जागेचा वापर अद्यापही विविध प्रशासकीय व कायदेशीर कारणांमुळे प्रलंबित आहे.हा विषय लातूर जिल्ह्याच्या दुष्टीने महत्वाचा असून या महत्त्वपूर्ण प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी लातूर जिल्ह्यातील खासदार-आमदार, रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच राज्य शासनाच्या संबंधित विभागांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आ. पवार यांनी मंत्री मुश्रीफ यांना सविस्तर निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, लातूर येथील जुने रेल्वे स्थानक ते हरंगुळ स्थानक दरम्यानची सुमारे ३२ हेक्टर ८१ आर जागा महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २९ मार्च २००७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. या बदल्यात रेल्वे विभागाला पुण्यातील लोहगाव व हडपसर येथील जागा तसेच ४५ निवासी घरे उपलब्ध करून देण्याचे निश्चित करण्यात आले होते.त्यानुसार शासनाने आवश्यक कार्यवाही करून रेल्वे विभागासाठी ४५ निवासस्थाने उभारून त्यांचा ताबाही रेल्वे प्रशासनाला दिला. तसेच लातूर येथील २.४५ हेक्टर जागा विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयासाठी हस्तांतरित करण्यात आली. संबंधित जागेचा ताबा जिल्हा प्रशासनामार्फत वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाकडे देण्यात आला असून अभिलेखांमध्येही आवश्यक नोंदी करण्यात आल्या आहेत.

मात्र, संपूर्ण ३२ हेक्टर ८१ आर जागेच्या मोबदल्याबाबत काही बाबी प्रलंबित असल्याचा दावा रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात रेल्वे विभागाने न्यायालयात दिवाणी दावा दाखल केल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयाच्या नावावर जागा हस्तांतरित होऊनही तिचा प्रत्यक्ष वापर करता येत नाही. परिणामी रुग्णालय विस्तार, सुपरस्पेशालिटी इमारतींची उभारणी, वैद्यकीय शिक्षण सुविधांचा विकास आणि रुग्णसेवा वाढविण्याच्या योजना रखडल्या आहेत.आ. अभिमन्यू पवार यांनी निवेदनात नमूद केले आहे की, सदर जागा नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालय इमारत आणि विद्यमान वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने तिचा उपयोग वैद्यकीय सुविधांच्या विस्तारासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. जागेचा प्रश्न निकाली निघाल्यास रुग्णालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी वाढ होऊन लातूरसह संपूर्ण मराठवाड्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार व आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होऊ शकतील.

या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी, विधी व न्याय विभाग, महसूल विभाग, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी लातूर, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता तसेच लातूर जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी यांची संयुक्त आढावा बैठक तातडीने आयोजित करण्यात यावी, अशी मागणी आ. पवार यांनी केली आहे.

लातूरच्या आरोग्य क्षेत्राच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर मार्ग काढावा, अशी अपेक्षाही आ. पवार यांनी व्यक्त केली आहे.



# दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद विज्ञान महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्ह उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या नव्या संधी

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दयानंद एज्युकेशन सोसायटीतर्फे छशुरर्छेंर झीेंशलह, पुणे कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह कार्यक्रम सोमवार वार, ८ जून २०२६ रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी एकूण ३५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यार्थ्यांसाठी ऍप्टिट्यूड टेस्ट,एच.आर. राऊंड,इंटरव्ह्यू यशस्वीपणे पार पडले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. बेल्लाळे यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड होते.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर तंत्रज्ञानच्या क्षेत्रात नोकरीची सुवर्णसंधी उपलब्ध झाली. हा कॅम्पस इंटरव्ह्यू ड्राइव्ह दयानंद विज्ञान महाविद्यालयांचा सहयोगाने घेण्यात आला.

प्रारंभी कंपनीच्या मिस. स्वप्नाली लाटकर , कठ चरपरसशी व श्री. प्रदीप मोरे, तांत्रिक व्यवस्थापक यांचा सत्कार करण्यात आला.

या कॅम्पस ड्राइव्हसाठी कंपनीचे मानव संसाधन विभागाचे अधिकारी व तांत्रिक तज्ञ उपस्थित होते.

निवड प्रक्रियेत प्रथम ऑनलाइन अभियोग्यता चाचणी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर गुणवत्ता तांत्रिक कोडिंगची लेखी परीक्षा घेण्यात आली. नियंत्रण आदी विषयांवर आधारित तांत्रिक मुलाखत घेण्यात आल्या. मुलाखतीद्वारे



विद्यार्थ्यांची संवादकौल्यि,आत्मविश्वास व कायमक्षर्तेचे मूल्यमापन करण्यात आले.

या निवड प्रक्रियेत व स्पधामत्र्क वातावरणात गुणवत्तेच्या आधारे ०६ विद्यार्थ्यांची अंतिम मुलाखत साठी निवड करण्यात आली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक ४.५ - ६ लाखाचे पॅकेज मिळेल. विद्यार्थ्यां मध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कॅम्पस ड्राइव्ह च्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय याच्या वतीने श्री.अनिल बिरादार (टी.पी.ओ., दयानंद शिक्षण संस्था), प्रा. डॉ. रोहिणी शिंदे(विभागप्रमुख, संगणक शास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान विभाग), प्रा. सुजाता काळे तसेच सहकारी प्राध्यापक व सपोर्ट स्टाफ यांचे योगदान लाभले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बेल्लाळे यांनी उद्योग- शिक्षण दुवा अधिक मजबूत करण्यासाठी अशा उपक्रमाचे सातत्याने आयोजन केले जाईल असे सांगितले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव श्री. बियाणी,सहसचिव विशाल लाहोटी,सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे,कोषाध्यक्ष संजय बोरा तसेच विभागप्रमुख व प्राध्यापक यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लातूर जिल्हा वकील मंडळातर्फे न्यायनगरीत नव्याने रुजू झालेल्या न्यायाधीशांचा सत्कार सोहळा संपन्न



**लातूर/प्रतिनिधी:** दि. ९/६/२०२६ रोजी लातूर जिल्हा वकील मंडळाच्या सभागृहामध्ये लातूर न्यायनगरीत नव्याने रुजू झालेल्या न्यायाधीशांचा वकील मंडळाच्या परंपरेप्रमाणे सत्कार सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. यावेळी वकील मंडळाची गौरवशाली परंपरा व इतिहास हा नव्याने रुजू होत असलेल्या न्यायिक वर्गांना प्रास्ताविकामध्ये सांगण्यात आला. यावेळी सत्कारमूर्ती मा. न्यायाधीश श्री. एस. ए. सय्यद, साहेब मा. न्यायाधीश श्री. एफ. के. शेख साहेब, मा. न्यायाधीश पी. आर. नवले साहेब , मा. न्यायाधीश एस. बी. पाटील साहेब, मा. न्यायाधीश बहेरवाल साहेब, मा. श्री. न्यायाधीश यु. बी. कलपगार साहेब , मा. न्यायाधीश श्रीमती नागरगोजे मॅडम, मा. न्यायाधीश श्रीमती. एस. एस. पाटील मॅडम हे उपस्थित होते.

यांचा सन्मान वकील मंडळाचे जेष्ठ विधीज्ञ मा. ॲड. जगन्नाथ चिताडे सर, ॲड. सुरेशराव मुचाटे सर, ड. राजमाने सर, ॲड. बाबुरावजी बंडगर सर, ॲड. एस.एम.कोतवाल सर , ड. जयश्री पाटील मॅडम, ॲड. जी. बी. आराध्ये सर, ॲड. लहु सुरवसे सर यांच्या द्वारे वृक्ष रोपे देऊन सन्मान करण्यात आला. मा. ॲड. जगन्नाथ चिताडे सर, यानी वकील मंडळाची आजवरची कारकीर्द आपल्या मनोगतातून व्यक्त केली सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. लहु चामे यांनी केले व अध्यक्षीय समारोप ॲड. शिवकुमार जाधव यांनी केले व आभार ॲड. नितीन राठोड यांनी मानले.

सदर कार्यक्रमास जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शिवकुमार जाधव, सचिव गुरुप्रसाद येरटे, सहसचिव, ॲड. सिध्देश्वर धायगुडे, ग्रंथालय सचिव ॲड. अमित आर्वीकर, महिला उपाध्यक्ष ॲड. मंजुषा शिंदे, महिला सहसचिव ॲड. श्रध्दा पाटील, तसेच कार्यकारिणी सदस्य , ॲड. किशोर शिंदे, ॲड. आरीफखान पठाण,ॲड. करिश्मा शेख,तसेच सर्व वकील जेष्ठ विधीज्ञ बंधु भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित.

# रेल्वे आरोग्य सेवांचे महासंचालक यांच्या हस्ते भायखळा येथील डॉ. बी.ए.एम. रुग्णालयात 'सर्जिकल अतिदक्षता विभाग' (SICU), अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि इतर आरोग्य सुविधांचे उद्घाटन

**सोलापूर/प्रतिनिधी:** रेल्वे आरोग्य सेवांचे महासंचालक (DGRHS) डॉ. जगदीश चंद्र यांनी दिनांक ७ जून २०२६ रोजी मध्य रेल्वेच्या प्रमुख 'टर्शरी-केअर' (उच्चस्तरीय वैद्यकीय सेवा देणाऱ्या) रुग्णालयाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी भायखळा येथील 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हॉस्पिटल' (डॉ. बी.ए.एम. रुग्णालय) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या 'सर्जिकल अतिदक्षता विभागाचे (SICU) आणि अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांचे उद्घाटन केले.

यावेळी १८ खाटांच्या अत्याधुनिक सर्जिकल अतिदक्षता विभागाचे (SICU) सोबतच ५४ लाख रुपये किमतीचे ड्रॅगर, भूल देण्याचे यंत्र (अनेस्थेशिया मशीन), ५४ लाख रुपये किमतीचे अल्ट्रासाऊंड मशीन आणि १.३ कोटी रुपये किमतीचे उच्च दर्जाचे 'ऑर्थोपेडिक टेबल' यांचेही उद्घाटन करण्यात आले. नव्याने सुरू झालेला हा 'सर्जिकल अतिदक्षता विभाग' (SICU), प्रगत मॉनिटरिंग प्रणाली आणि सर्वसमावेशक अतिदक्षता सेवांच्या माध्यमातून गंभीर आजारी शस्त्रक्रिया रुग्णांवर उपचार करण्याच्या रुग्णालयाच्या क्षमतेत लक्षणीय वाढ करेल.

डॉ. जगदीश चंद्र यांनी रुग्णालयातील रेडिओलॉजी/सीटी स्कॅन केंद्र, फिजिओथेरपी, कॅज्युअल्टी (आपत्कालीन विभाग), अतिदक्षता विभाग (ICU), डायलिसिस केंद्र इत्यादी विविध सुविधांची पाहणी केली. तसेच, रेल्वे लाभार्थ्यांसाठी आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या उपक्रमांचा आणि रुग्णालयाच्या वैद्यकीय सेवांचा आढावा घेतला. भायखळा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हॉस्पिटलमधील सुविधा, कामगिरी आणि सेवांची माहिती देणाऱ्या डिजिटल मासिकाचे (ई-मॅगझिनचे) अनावरणही महासंचालकांच्या (DGRHS) हस्ते



करण्यात आले.

याप्रसंगी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. राजीव श्रीवास्तव, प्रधान मुख्य वैद्यकीय संचालक डॉ. ममता शर्मा, मध्य रेल्वेचे विभाग प्रमुख (PHODs); डॉ. उषा जगदीश चंद्र, मध्य रेल्वे महिला कल्याण संघटनेच्या (CRWWO) अध्यक्षा श्रीमती स्निग्धा श्रीवास्तव, मुंबई विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. हिरेश मीना, डॉ. बी.ए.एम. रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. कनकराय, मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

यावेळी डॉ. जगदीश चंद्र यांनी रेल्वे लाभार्थ्यांच्या हितासाठी आरोग्य सेवांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्याच्या आणि अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या दिशेने मध्य रेल्वेने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. गुणवत्तापूर्ण आणि रुग्ण-केंद्रित आरोग्य सेवा पुरवण्याबाबत रुग्णालय प्रशासन आणि आरोग्य सेवा पथकांच्या समर्पण व निष्ठेची त्यांनी प्रशंसा केली. रुग्णालयाच्या प्रशंसनीय कामगिरीची आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत, त्यांनी डॉ. बी.ए.एम.रुग्णालयासाठी ५०,००० रुपयांच्या रोख पुरस्काराची घोषणा केली. तसेच, रुग्णालय प्रशासन, डॉक्टर, परिचारिका आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समर्पण व कठोर परिश्रमांचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. राजीव श्रीवास्तव यांनी रुग्णांचे समाधान आणि सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी रुग्णांच्या अभिप्रायाची यंत्रणा अधिक बळकट करण्यावर आणि रुग्णांच्या समस्यांबाबत तत्परतेने प्रतिसाद देण्यावर भर दिला. त्यांनी रुग्णालयाच्या एकूण कामकाजाबद्दल समाधानही व्यक्त केले.

हे उद्घाटन डॉ. बी.ए.एम. रुग्णालयातील आरोग्य सेवा बळकट करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. तसेच, रेल्वे परिवाराला प्रगत, सुलभ आणि तंत्रज्ञानावर आधारित वैद्यकीय सेवा पुरवण्याबाबतची मध्य रेल्वेची कटिबद्धता यातून दिसून येते.

# खरीप हंगाम २०२६: राष्ट्रीय खाद्यतेल अभियान: प्रमाणित बियाणे पुरवठ्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी आणि सहकारी संस्थांकडून अर्ज मागविले

लातूर, जिमाका खरीप हंगाम २०२६ मध्ये 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया' योजनेचा लाभ जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी लातूर जिल्हा कृषी विभागाने पात्र इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांकडून प्रमाणित बियाणे पुरवठादार संस्था म्हणून अर्ज मागवण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व संबंधित संस्थांनी आपले अर्ज १२ जून २०२६ पर्यंत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, लातूर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत प्रामुख्याने सोयाबीन आणि इतर तेलबियांच्या प्रमाणित बियाण्यांचे वितरण केले जाणार आहे. यामध्ये ०५ वर्षांच्या आतील अधिसूचित वाण आणि ५ ते ८ वर्षांच्या आतील अधिसूचित वाण या बियाणांचा समावेश राहील. बियाणे पुरवठादार संस्था म्हणून इच्छुक संस्थेची 'साथी' पोर्टलवर नोंदणी झालेली असणे अनिवार्य आहे. बियाण्याची गुणवत्ता, शिफारस, उत्पादन कालावधी, बियाणे उत्पादकांची नोंदणी, तसेच प्रचलित बियाणे कायदे, नियम व इतर विहित अटींची पूर्तता करणारी संस्था असावी. गुणवत्ता आणि उगवणक्षमतेची हमी असलेल्या अधिसूचित वाणांच्या (०५ वर्षांच्या आतील तसेच ५ ते ८ वर्षांच्या आतील) प्रमाणित बियाण्यांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. बियाण्यांचा पुरवठा तालुकास्तरावर केला जाणार असल्याने, संबंधित संस्थेकडे प्रत्येक तालुकानिहाय अधिकृत वितरक असणे आवश्यक आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## धाराशिव रेल्वे स्थानकावरील नव्याने उभारण्यात आलेल्या प्रवासी शेडच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह

धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव रेल्वे स्थानकावरील नव्याने उभारण्यात आलेल्या प्रवासी शेडच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अगदी रिमझिम पावसातही शेडमधून गळती होत असून, पावसाचे पाणी थेट प्रवाशांच्या बाकड्यांवर पडत असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी उभारण्यात आलेल्या शेडमुळेच प्रवाशांची अडचण वाढल्याची भावना व्यक्त होत आहे.

रेल्वे प्रशासनाने काही महिन्यांपूर्वी स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन शेड उभारले. मात्र पावसाळ्याच्या सुरुवातीलाच या शेडच्या गुणवत्तेची पोलखोल झाली आहे. शेडच्या अनेक ठिकाणांहून गळती होत असून, विशेष म्हणजे ज्या बाकड्यांवर प्रवासी बसतात त्याच ठिकाणी पाण्याच्या धारा पडत आहेत. त्यामुळे प्रवाशांना उभे राहूनच रेल्वेची प्रतीक्षा करावी लागत आहे.

धाराशिव रेल्वे स्थानकावरून मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, धनबाद, हैदराबाद आदी महत्त्वाच्या मार्गांवर रेल्वेगाड्या धावतात. त्यामुळे स्थानकावर दररोज मोठ्या संख्येने प्रवाशांची वर्दळ असते. वाढत्या प्रवासी संख्येनुसार सुविधा उभारण्यात येत असल्या तरी त्या दर्जेदार नसल्याची टीका प्रवाशांकडून होत आहे.उळीं डेलरश्र ऑळवशी

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या सुविधांमध्येच त्रुटी दिसून येत आहेत. शेड उभारणीच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले का, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. तसेच संबंधित कंत्राटदारावर कारवाई करून शेडची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने स्थानकावरील सर्व सुविधांची तपासणी करून गळतीची समस्या त्वरित दूर करावी, अन्यथा प्रवाशांचा रोष वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अगदी बारीक पाऊस सुरु होता. तरी शेडमधून थेट बाकड्यांवर गळती सुरु होती. त्यामुळे प्रवाशांना बाकड्यांवर बसता येत नव्हते. त्यात भर म्हणजे नागपूर ते कोल्हापूर रेल्वे रविवारी तीन तास उशिराने धावत होती. परिणामी अनेक प्रवाशांना जमिनीवर बसावे लागले तर अनेकांना ताटकळत थांबावे लागले. हा प्रकार चुकीचा आहे.

## शेतकऱ्यांचे ताजे दूधच ठरत आहे सर्वात सुरक्षित पर्याय! दुधातील भेसळीचे जाळे उघड; केमिकलयुक्त दुधामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

धाराशिव (शेख अंजुम)- जिल्ह्यात दिवसेंदिवस दुधातील भेसळीचे प्रकार वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पाण्यापासून सुरू होणारा हा प्रवास केमिकल ब्लेंडेड लिक्विडपर्यंत पोहोचत असल्याने शुद्ध दुधाची ओळख करणे सर्वसामान्यांसाठी कठीण बनले आहे.

तज्ज्ञांच्या मते, काही ठिकाणी दुधामध्ये पाणी, स्टार्च, डिटर्जंट, युरिया, फॅट वाढविणारी रसायने तसेच कृत्रिम घटकांचा वापर होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अशा दुधाच्या सेवनामुळे लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

याउलट धाराशिव जिल्ह्यातील अनेक स्थानिक शेतकरी पारंपरिक पद्धतीने दुग्ध व्यवसाय करत असून, थेट ग्राहकांना ताजे आणि नैसर्गिक दूध उपलब्ध करून देत आहेत.

त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांकडून थेट दूध घेणे हा अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि टिकाऊ पर्याय असल्याचे मत ग्राहकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन तसेच संबंधित यंत्रणांनी दुधातील भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. कारण प्रश्न केवळ दुधाचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या आरोग्याचा आहे.

## धाराशिवमध्ये १२ जूनपासून PLFS आणि -SUSE सर्वेक्षणांना प्रारंभ

### रोजगार,बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्राच्या विकासाचा आरसा ठरणार राष्ट्रीय सर्वेक्षण

धाराशिव (जिमाका ) केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या (MoSPI) मार्गदर्शनाखाली अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय,महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणारी पीरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे (PLFS) आणि ॲन्युअल सर्व्हे ऑफ अनइन्कॉर्पोरेटेड सेक्टर एंटरप्रायझेस (ASUSE) ही दोन महत्त्वाची राष्ट्रीय स्तरावरील सर्वेक्षणे जिल्ह्यात १२ जून २०२६ पासून सुरू होत असून डिसेंबर २०२६ पर्यंत चालणार आहेत.या सर्वेक्षणांचा शुभारंभ जिल्हाधिकारी यांच्या हस्ते १२ जून रोजी करण्यात येणार आहे.

भारत सरकारतर्फे नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या या सर्वेक्षणांद्वारे रोजगार,बेरोजगारी तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्राची अद्ययावत व विश्वासार्ह माहिती संकलित केली जाते.या आकडेवारीच्या आधारे केंद्र व राज्य शासन विविध विकासात्मक योजना, रोजगारविषयक धोरणे आणि आर्थिक नियोजनाची आखणी करत असते.

PLFS (Periodic Labour Force Survey) हे सर्वेक्षण देशातील रोजगार व बेरोजगारीची स्थिती,महिला कामगार सहभागाचे प्रमाण,स्वयंरोजगार,वेतनाधारित रोजगार तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील श्रमबाजाराची परिस्थिती याविषयी अद्ययावत माहिती उपलब्ध करून देते.या सर्वेक्षणातून प्राप्त होणारी माहिती रोजगारनिर्मिती,कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक-आर्थिक धोरणांच्या आखणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

तर ASUSE (Annual Survey of Unincorporated Sector Enterprises) हे सर्वेक्षण असंघटित क्षेत्रातील उत्पादन (Manufacturing),व्यापार (Trade) आणि सेवा (Services) क्षेत्रातील उद्योग आस्थापनांची संख्या,त्यामधील रोजगार, उत्पादनक्षमता,स्थूल मूल्यवर्धन (GV-), उत्पन्न आणि इतर आर्थिक निर्देशांकांची माहिती संकलित करते. देशाच्या अर्थव्यवस्थेत असंघटित क्षेत्राचा मोठा वाटा असल्यामुळे या क्षेत्राच्या विकासाचा आढावा घेण्यासाठी -SUSE सर्वेक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.या माहितीच्या आधारे राज्य व जिल्हास्तरीय उत्पन्नाचे अंदाज तसेच विविध विकास निर्देशांक तयार करण्यास मदत होते.

धाराशिव जिल्ह्यात PLFS सर्वेक्षणासाठी ग्रामीण भागातील ४८ आणि शहरी भागातील २४ अशा एकूण ७२ नमुना घटकांची,तर ASUSE सर्वेक्षणासाठी ग्रामीण भागातील १२ आणि शहरी भागातील ३२ अशा एकूण ४४ नमुना घटकांची निवड करण्यात आली आहे. निवडलेल्या नमुना घटकांमध्ये प्रशिक्षित प्रगणक व पर्यवेक्षकांमार्फत नमुना पद्धतीने माहिती संकलित केली जाणार आहे.

सर्वेक्षणासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी निवडलेल्या कुटुंबांना तसेच उद्योग आस्थापनांना प्रत्यक्ष भेट देऊन मुलाखतींच्या माध्यमातून माहिती गोळा करणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आणि संबंधित आस्थापनांनी अचूक व आवश्यक माहिती देऊन या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमास सहकार्य करावे,असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

देशातील रोजगार,उद्योजकता आणि असंघटित क्षेत्राच्या आर्थिक योगदानाचे वास्तव चित्र समोर आणणारी PLFS आणि ASUSE ही सर्वेक्षणे केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून भविष्यातील विकास धोरणांची दिशा निश्चित करणारी ठरणार आहेत.त्यामुळे धाराशिव जिल्ह्यात सुरू होणाऱ्या या सर्वेक्षणांकडे प्रशासन,उद्योग क्षेत्र आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## तांब्याचे केबलची अज्ञाताने केली चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-सतिश देविदास थोडसरे, वय ६० वर्षे, रा. तेर ता. जि. धाराशिव यांचे शेत गट नं १३० मधील शेत शिवार तेर मधील विहरीवरील व तेरणा मध्यम प्रकल्प येथील एकुण तांब्याचे केबल ५२० फुट २३,९९८ किंमतीचा माल दि.०८.०६.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सतिश थोडसरे यांनी दि.०९.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

## आईच्या आक्रोशाने प्रशासन हादरले; नवजात बालमृत्यू प्रकरणी डॉक्टर व कर्मचाऱ्याचे निलंबन

धाराशिव (शेख अंजुम)- धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत असलेल्या स्त्री रुग्णालयातील नवजात बालमृत्यू प्रकरणाने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. तुळजापूर येथील कविताताई जगताप यांना प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रसूतीदरम्यान वेळेत सिझेरियन करण्यात आले नाही तसेच एका कर्मचाऱ्याने पोटावर दाब दिल्याने बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात आंदोलन छेडत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. आंदोलनाची तीव्रता वाढल्यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेत कारवाईचा निर्णय घेतला.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. शैलेन्द्र चौहान यांनी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. तृप्ती राडकर यांना कर्तव्यात हलगर्जीपणा व कसूर केल्याच्या आरोपावरून निलंबित केले. तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी सौरभ जाधव यांनाही गैरवर्तणूक व मारहाणीच्या आरोपांवरून निलंबित करण्यात आले आहे.

या कारवाईमुळे आंदोलनकर्त्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईक व नागरिकांकडून होत आहे. या घटनेमुळे शासकीय आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून जिल्हाभरातून संताप व्यक्त केला जात आहे.

आईच्या वेदनेने आरोग्य व्यवस्थेतील कथित बेफिकीरी उघड केली; जनआक्रोशानंतर प्रशासनाला कारवाई करावीच लागली, अशी चर्चा आता जिल्ह्यात सुरू आहे.

## पुणे येथील महोत्सवामध्ये पुणेकरांनी चाखला धाराशिवच्या गावरान आंब्याचा गोडवा



तेर(प्रतिनिधी)-बायफ संस्थेच्या वतीने पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या गावरान आंबा महोत्सवात धाराशिव जिल्ह्यातील २० पेक्षा अधिक गावरान आंब्यांच्या जातींचे आकर्षक प्रदर्शन करण्यात आले. महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या महोत्सवात सहभाग घेत विविध स्थानिक आंबा जातींची माहिती नागरिकांसमोर मांडली.

या महोत्सवात ३३५ हून अधिक गावरान आंबा जातींचे प्रदर्शन करण्यात आले होते. प्रत्येक आंबा जातीची वैशिष्ट्ये, त्यांची ओळख आणि स्थानिक महत्त्व याबाबतची माहिती संबंधित शेतकऱ्यांनी अभ्यागतांना दिली. कार्यक्रमाचे उद्घाटन अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते झाले. महोत्सव पाहण्यासाठी नागरिक, शेतकरी आणि आंबाप्रेमींनी मोठी गर्दी केली होती.

धाराशिव, कळंब आणि तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी जतन केलेल्या मौल्यवान आंबा संपदेचे प्रदर्शन यावेळी करण्यात आले. विशेषतः धाराशिव तालुक्यातील रुई (ढोकी), तडवळे (क.), मुळेवाडी, डकवाडी आणि खेड येथील शेतकऱ्यांनी संवर्धित केलेल्या विविध आंबा जातींचा समावेश होता. शेप्या, रगदार काळ्या, पंधरकी, शैद्र्या अशा स्थानिक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या गावरान आंब्यांच्या जातींनी अभ्यागतांचे विशेष लक्ष वेधून घेतले. चव, आकार, रंग तसेच स्थानिक हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता यामुळे या जातींना मोठी पसंती मिळाली.

महोत्सवाच्या माध्यमातून गावरान आंब्यांचे संवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि पारंपरिक फळसंपदेचे जतन याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. बायफ संस्थेने केलेले नियोजन आणि प्रदर्शनाची आकर्षक मांडणीही उपस्थितांच्या पसंतीस उतरली.

दुष्काळी भागातील आंब्यांची ताकद महोत्सवात प्रदर्शित झालेल्या अनेक गावरान आंबा जाती या कमी पाण्यावरही वाढणाऱ्या असल्याचे दिसून आले. दुष्काळी भागातील या जातींना रासायनिक खते किंवा विशेष व्यवस्थापनाची आवश्यकता नसते. बदलत्या हवामानात टिकून राहण्याची क्षमता असल्याने या आंबा जाती भविष्यात महत्त्वपूर्ण ठरू शकतात. त्यामुळे संवर्धन आणि प्रसार करण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली.

## धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

कळंब(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे: अंतर्गत निता वय ३५ वर्षे, रा.इंदीरानगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव या दि.०९.०६.२०२६ रोजी मोहेकर कॉलेज समोर इंदीरानगर कळंब अंदाजे २४,००० किंमतीची ५० लिटर गावठी दारु व ४०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत सुनिल रा. मोतीराम मुळेगाव तांडा ता. जि. धाराशिव हे दि.०९.०६.२०२६ रोजी नळदुर्ग ते जळकोट जाणारे एनएच ६५ रोडवर मुर्टा पाटीवर अंदाजे ५२,००० किंमतीची १२० लिटर गावठी दारु मोटरसायकलसह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.तर संगिता वय ४५ वर्षे, रा. नंदगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.०९.०६.२०२६ रोजी १०.५० वा. सु. आपल्या राहत्या धराचे पत्र्याचे शेडच्या बाजूस आडोशाला अंदाजे २,४०० किंमतीची ३० लिटर गावठी दारु मोटरसायकलसह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वतंत्र २गुन्हे नोंदविले आहेत.

## मोटरसायकल अपघातात एकाचा मृत्यू गुन्हा दाखल

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत राहुल दिलीप भोगील, वय ३२ वर्षे, रा. दांडेगाव ता. भुम जि. धाराशिव हे दि.१९.०१.२०२६ रोजी मोटरसायकल क्र एमएच ०१ ए.यु.१०२७ वरुन जात होते. दरम्यान भुम मार्गे दांडेगाव येथे जात असतानात बिरुबाची वाडी येथे कॅनल जवळ राहुल भोगील यानी त्याचे ताब्यातील मोटरसायकल हा चालवून अपघात होवून गंभीर जखमी होवून मयत झाले. आम्र नं ०२/२०२६ कलम १९४ बी.एन.एस.एस. मधील चौकशी वरुन फिर्यादी नामे- संध्या आण्णासाहेब भोसले, वय ४० वर्षे, नेमणुक पोलीस ठाणे आंबी यांनी दि.०९.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१), २८१, सह कलम १८० मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649